बुधवार, ३ जानेवारी २०२४

⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

⊙ मराठी ⊙ दैनिक

⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - १४०

⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६


# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक




●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) WEDNESDAY 3 JANUARY 2024 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-03 ●ISSUE-140 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-05


# ट्रकची चाके थांबलेलीच

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान आणि मध्य प्रदेशातील ट्रक चालकांनी या आंदोलनात सहभाग घेतला आहे. या ट्रक चालकांनी कामबंदचा इशारा दिल्याने अनेक ठिकाणी ट्रक उभे राहिले आहेत. त्याचा थेट परिणाम बाजारावर दिसून आला. परिणामी, पेट्रोल-डिझेल, गॅस सिलिंडर, भाजीपाला, बांधकाम साहित्य आणि किराणा सामानाच्या पुरवठ्यावर परिणाम झाला आहे. सर्वाधिक फटका इंधन वितरणाला बसला आहे. अनेक पेट्रोल पंपांवरील इंधन संपले आहे. त्यामुळे अनेक वाहन चालकांच्या पेट्रोल पंपांवर रांगा लागल्या आहेत.**



देशातील ट्रान्सपोर्ट असोसिएशनशी संबंधित लोकांनुसार, देशात जवळपास 95 लाख ट्रक आणि ट्रँकर आहे. त्यामधील 30 लाखांहून अधिक ट्रक आणि ट्रँकरची सेवा ठप्प झाली आहे. त्यामुळे पूर्ण व्यवस्थाच ठप्प झाली आहे. रस्त्यावर ट्रक, कंटेनर, बस, टँकर उभी करण्यात आली आहे. अर्थात यामध्ये काही संघटनांनी काढता पाय घेतला असला तरी अजून संपाचे रुतलेले चाक मोकळे झालेले नाही. एका दिवसाच्या संपामुळे जवळपास 120 ते 150 कोटी रुपयांची उलाढाल ठप्प झाली आहे. गेल्या तीन दिवसांत 450 कोटींचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. सर्वाधिक फटका पेट्रोल पंप आणि भाजीपाला मार्केटला बसला आहे. संपावर लवकर तोडगा निघाला नाही तर दूधासह दैनंदिन वस्तू महाग होण्याची भीती आहे. त्याचा फटका सर्वसामान्यांना बसण्याची शक्यता आहे. जर एखादी व्यक्ती ट्रकला येऊन धडकली. विचित्र अपघात झाला. अशावेळी ट्रक चालकाने घटनास्थळावरुन पोबारा केला तर त्याला दहा वर्षांच्या शिक्षेसह जबरी दंडाची तरतूद करण्यात आली आहे. विरुद्ध दिशेने येणारे वाहन अथवा एखादी व्यक्ती अचानक आल्यास अशावेळी चालकाला संधी मिळू शकते. पण अशा प्रकरणात 5 वर्षांच्या शिक्षेची तरतूद आहे. नियमाविरोधात चालकांनी संपाचे हत्यार उपसले आहे. त्यांच्या मते, चुकी नसताना त्यांना नाहक अशा प्रकरणात शिक्षा होऊ शकते.

## चर्चेतली बातमी

# हानेडा विमानतळावर दोन विमानांची धडक

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** जपानची राजधानी टोक्योमधील हानेडा विमानतळावर मोठी दुर्घटना घडली आहे. जपान एअरलाईन्सच्या एका विमानाला आग लागल्याच्या घटनेने खळबळ उडाली आहे. विमानतळावरील कर्मचारी आणि अग्निशमन दलाकडून आग विझवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न चालू आहेत. धावपट्टीवर धावत्या विमानाने पेट घेतल्याचे व्हिडीओ समाजमाध्यमांवर व्हायरल होत आहेत. धावपट्टीवर तटरक्षक दलाचे विमान आणि प्रवासी विमानाची टक्कर होऊन आग लागली असे अग्निशमन दलाकडून सांगण्यात आले आहे. दरम्यान, जपानच्या परिवहन आणि पर्यटन मंत्रालयाने म्हटले आहे की, तातडीने या प्रकरणाची चौकशी केली जाईल. तटरक्षक दलाचं विमान आणि प्रवासी विमानाची टक्कर झाल्यानंतर जपान एअरलाईन्सच्या प्रवासी विमानाने पेट घेतला. या प्रवासी विमानात ३७९ लोक (प्रवासी आणि क्रू) होते. त्यानंतर विमान थांबवून सर्व प्रवाशांसह क्रूमधील सदस्य तसेच पायलट्सना सुरक्षित विमानाबाहेर काढण्यात आले. त्यामुळे कुठलीही जीवितहानी झाली नाही.

# सोयाबीनची होळी करत भूमिपुत्रांचा आक्रोश; जिल्हाधिकारी कार्यालयावर पदयात्रा

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत पाटील**

**वाशिम :** राज्य आणि केंद्र सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणाच्या निषेधार्थ भूमिपुत्र शेतकरी संघटनेकडून रिसोड ते वाशिम आक्रोश पदयात्रा काढण्यात आली होती. सदर पदयात्रा काल जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकली. दरम्यान जिल्हाभरातून शेतकऱ्यांनी मूठ मूठ जमा केलेल्या सोयाबीनची होळी करत भूमिपुत्रांनी आपला निषेध नोंदविला. या आक्रोश पदयात्रेचे नेतृत्व भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णूपंत भुतेकर यांनी केले.

भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णुपंत भुतेकर यांच्या नेतृत्वात 31 डिसेंबर 23 ते 1 जानेवारी 2024 ला रिसोड ते जिल्हाअधिकारी कार्यालय वाशिम पर्यंत पन्नास कि.मी. ची पदयात्रा काढण्यात आली. पदयात्रेचे ठिक- ठिकाणी स्वागत करण्यात आले. पदयात्री साठी रिसोड ते वाशिम रोडवरील सर्व गावामध्ये चहा व फराळाची व्यवस्था करण्यात आली होती.



रिसोड मतदार संघाचे आमदार आमित झनक यांनी शेतकऱ्यांचा मागण्यांबाबत सकारात्मक विचार करून पदयात्रेत एक कि.मी. पायी प्रवास करीत पदयात्रेस पाठिंबा दिला. गजानन पाचरणे, जि.प. सभापती वैभव सरनाईक यांनीही पदयात्रेत चालुन पाठींबा दिला. रिसोड बाजार समीतीचे सभापती संजय शिंदे, उपसभापती राजु आरू, रवींद्र चोपडे, भगवान गाडे, धनजय बोरकर पुर्ण वेळ पदयात्रेत सहभागी होते. जाहीर सभेत संस्थापक अध्यक्ष विष्णुपंत भुतेकर यांनी उत्पादन खर्च वसुल होत नसलेल्या सोयाबीनचा मुद्दा मांडत आसतानां सरकारने 2023 मधे भारताच्या इतिहासातील सर्वात मोठी 1 लाख 67 हजार मे. टन तेल आयात केल्या मुळे देशांतर्गत तेल उद्योग व शेतकऱ्यांवर प्रचंड संकट कोसळले आहे. तुर, कापुस यांचीही परीस्थी वेगळी नसल्याचे त्यांनी यावेळी विषद केले. यावेळी वाशिम- यवतमाळाच्या खासदार भावनाताई गवळी यांनी पदयात्रेची दखल घेत भेट दिली व निवेदन घेऊन शेतकऱ्यांच्या मागण्यांबाबत आपण सकारात्मक आसल्याचे सांगीतले. सभा संपल्यानंतर जिल्हाअधिकारी वाशिम यांना भूमिपुत्र च्या शिष्टमंडळाच्या वतीने खालील मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

यावेळी जिल्हाध्यक्ष रामेश्वर आवचार, आर. बी. खडसे, बाबाराव ढोणे, कारंजा तालुकाध्यक्ष देवेंद्र लांडकर, डॉ. तृप्ती गवळी, शंकरराव देशमुख यांनी आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमला डॉ. जितेंद्र गवळी, गजानन अमदाबादकर, विश्वनाथ शेवाळे, अरूण सुरोशे, संजय शिंदे सभापती, रविंद्र चोपडे, राजु आरू उपसभापती, बंडू हाडे प.स. सभापती, संगीताताई मार्गे, बालाजी बोरकर, सचिन काकडे, विकास झुंगरे,भगवान गाडे, केशव गरकळ, देव इंगोले, बालाजी गोटे, संजय सदार, गजानन जाधव, गजानन सदार, विठ्ठल आरू,बालाजी बोरकर, संतोष सुर्वे, श्रीरंग नागरे, विनोद घुगे, भगवान बोरकर, गजानन आरु, राहुल बोडखे,भुषण मुराळे, भास्करराव देशमुख, सचिन काकडे, रवि जाधव, संतोष ठाकूर, रवि बोरकर, विष्णु सरकटे, राजु डांगे, जालिंदर देवकर, जगन गरकळ, गोपाल भिसडे, रजनिष खोंडकर, प्रकाश तात्या चोपडे, डॉ. दहीहंडे, प्यारेलाल नागरे, वैजनाथ रंजवे, संतोष गव्हाणे, डॉ. सुभाष नागरे, पप्पु हेंद्रे, पवन खोंडकर, शंकरराव देशमुख, विनोद लड्ढा, महाविर ठाकुर, पप्पु भुतेकर, राजु खांबलकर, रवि बोरकर, संतोष खरात, भागवत नरवाडे, बालाजी सोंळके, अर्जुनराव तुरूकमाने, बबनराव बोरकर, प्रकाश शिकारे, दिनकर बोरकर, सिताराम इगोले, शंकर हुबांड,मुरली गाडे, गोकुळ मंडलिक, नितीन गाडे,ग्यानदेव भुतेकर, दत्तराव इंगोले, वसंत डुबे, गजानन भुतेकर, गोरख भुतेकर, सुनील शिकारे, सीताराम लोखंडे, विजय बोरकर, डिगंबर इंगोले, कैलास पाटील, हिरामन खरात, सनिल पाटील यांच्यासह भूमिपुत्र चे कार्यकर्ते व मनोहर महाराज अवचार व त्यांचा सर्व भजनी संच उपस्थित होता.

# राज्यात एसटी बससेवा बंद होण्याची शक्यता


## मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भासह ट्रक चालकांचे आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** देशभर ट्रक आणि बसचालकांनी आंदोलन पुकारले असून इंधनाची वाहतूक आणि पुरवठा करणाऱ्या वाहनांवरील चालकही संपावर गेले आहेत. परिणामी, पेट्रोल, डिझेलचा तुटवडा निर्माण होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे वाहनांमध्ये पेट्रोल, डिझेल भरण्यासाठी मंगळवारी सकाळपासून पेट्रोल पंपावर वाहनचालकांनी गर्दी केली आहे. ट्रक-बस चालकांच्या संपाचा फटका एसटीलाही बसण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत. डिझेल अभावी एसटी बस सेवा बंद होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. 'हिट ॲण्ड रन' प्रकरणातील दोषींना १० वर्षांचा तुरुंगवास आणि सात लाख रुपये दंड अशा शिक्षेची तरतूद असलेल्या नवीन कायद्याविरोधात देशभरातील ट्रक आणि बसचालकांनी सोमवारपासून निदर्शने आंदोलन सुरू केले आहे. नववर्षाची सुरुवातच आंदोलनाने झाल्याने त्याचा फटका सर्वसामान्य नागरिकांना बसत आहे. नवी मुंबई, मुंबई, ठाणे, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भासह देशातील महत्त्वाच्या शहरात ट्रक आणि बस चालकांचे आंदोलन सुरू आहे. राज्यातही या आंदोलनाचा प्रभाव जाणवू लागला असून मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रात इंधन पुरवठा ठप्प झाला आहे. विदर्भात आंदोलन चिघळले असून विदर्भातील काही आगारांमधील एसटीच्या फेऱ्या रद्द करण्यात आल्या आहेत. तसेच देशभरात शांततेत सुरू असलेले आंदोलन आता चिघळू लागले आहे. महाराष्ट्राची जीवनवाहिनी म्हणून ओळख असलेली लालपरी सर्वसामान्य प्रवाशांसाठी खूप जवळची आहे. राज्य परिवहन (एसटी) महामंडळाच्या बहुसंख्य बसगाड्या डिझेलवर धावतात. दररोज एसटीच्या सरासरी १४ हजार बसेगाड्या धावतात. या बससाठी दररोज सरासरी ११ लाख लिटर डिझेल लागते. एसटीच्या बसना लागणाऱ्या डिझेलची पूर्तता न झाल्यास एसटीची सेवा खोळंबण्याची शक्यता आहे. त्यामुळे एसटीमधून प्रवास करणाऱ्या लाखो प्रवाशांना फटका बसण्याची शक्यता आहे. एसटीच्या २५० आगारांत बसगाड्यांमध्ये डिझेल भरण्याची सुविधा आहे. इंडियन ऑइल कार्पोरेशन व भारत पेट्रोलियम या दोन कंपन्यांकडून एसटी महामंडळ डिझेल खरेदी करते. सर्व आगारांत मंगळवारी पुरेल इतका डिझेल साठा उपलब्ध आहे. संप आणखी काही दिवस सुरू राहिल्यास डिझेलची डिझेलचा तुटवडा निर्माण होईल आणि एसटी बसच्या फेऱ्या रद्द कराव्या लागतील.








विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

अनेक आदिवासी विद्यार्थी या शाळेत जीवनाचे धडे गिरवत आहेत. केवळ पाठ्यपुस्तकी शिक्षण त्यांना इथे दिले जात नाही. शेती करणे, निरनिराळे उद्योगव्यवसाय करणे, निरनिराळी कौशल्ये हस्तगत करणे या गोष्टी त्यांना शिकवल्या जातात. जीवनमूल्ये शिकवली जातात. या विद्यार्थ्यांतून अनेक विद्यार्थी शिकून मोठे होऊन आज मोठमोठ्या पदांवर पोहोचले आहेत, तर काही आपल्या आदिवासी बांधवांची सेवा करत आहेत. डॉ प्रकाश आमटे म्हणतात, ' मी तर केवळ निमित्तमात्र आहे. हे सगळे टीमवर्क आहे. मला सेवाभावी कार्यकर्ते मिळाले म्हणून एवढे मोठे कार्य करणे शक्य झाले. ' त्यांचे हे उद्गार त्यांची नम्रता दर्शवतात. डॉ प्रकाश आणि डॉ मंदाताई यांना मॅगसेसे पुरस्कारासह अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कार आपल्या कार्यासाठी प्राप्त झाले आहेत. त्यांच्यामुळे या पुरस्काराना मोठेपण लाभले आहे. त्यांनी लिहिलेली ' प्रकाशवाटा ' आणि रानमित्र ही पुस्तके प्रसिद्ध आहेत. त्यांच्या जीवनाचे यथार्थ दर्शन घडवणारा ' डॉ प्रकाश बाबा आमटे- द रिअल हिरो ' हा सुंदर चित्रपट आहे. यात नाना पाटेकर यांनी डॉ प्रकाश आमटे यांची भूमिका साकारली आहे. त्या चित्रपटातील गुरु ठाकूर यांनी लिहिलेलं गीत अतिशय अर्थपूर्ण आणि सुंदर आहे. तू बुद्धी दे, तू तेज दे ,
नवचेतना विश्वास दे,
जे सत्यसुंदर सर्वथा आजन्म त्याचा ध्यास दे
अशाच ' सत्यसुंदराचा ध्यास घेतलेल्या ' डॉ प्रकाश आमटे यांचा आज जन्मदिन. त्यांना आणि त्यांच्या कार्याला शतशः प्रणाम !






## आनंदी पहाट

# नववर्षाचे स्वागत आध्यात्मिक बैठकीने व्हावे

आधुनिक केसरी

जेव्हा आपण नवीन वर्षाची सुरुवात साजरी करण्याचा विचार करतो, तेव्हा आपल्यापैकी अनेकांच्या मनात ज्या प्रतिमा, संकल्पना येतात त्या सोशल मीडियाद्वारे आपल्याला दिल्या जातात. अनेकजण मोठ्या पार्टीला जातात, विवाहित असलेल्या व्यक्ती जोडीदारासोबत जातात. अनेकदा एखाद्याला भेटण्याच्या आशेने जातात. अलीकडे सोशल मीडियामध्ये अशा कार्यक्रमातील फोटोज केवळ पोस्ट करण्यासाठी देखील सहभाग नोंदवला जातो. ह्यावेळी खरोखरच सहभागी होणाऱ्या व्यक्ती आनंद प्राप्त करू शकत असतात का, हाच कळीचा मुद्दा आहे. शारीरिकदृष्ट्या सभोवतालचा परिसर मनातून काढून टाकल्याने अनेकदा मानसिक भार हलका होऊ शकतो, जो नवीन वर्षाची सुरुवात करण्याचा उत्तम मार्ग असेल. आपल्याला आपल्या जीवनात नवीन गोष्टी आणायच्या असतील तर आपल्या करिअरला साजेसे नवे कपडे, आरोग्य सुधारण्यासाठी एक नवीन सवय, एक नवीन अध्यात्मिक सराव, यांपैकी काहीही असो, त्यासाठी आपल्या अंतर्मनात जागा बनवण्याची गरज असते. आपल्या सवयींबद्दल, त्या बदलण्याबद्दल, सुधारण्याबद्दल, त्यावर विचार करण्यासाठी थोडा वेळ घालवावा. आपण घरी वाचन किंवा ध्यान करण्यासाठी किमान दररोज ३० मिनिटे वेळ निश्चितच देऊ शकतो. थोडे मनाला शांत करून स्तब्ध बसावे, आपल्या मनाच्या सवयींचा विचार करावा. आपल्या स्वतःशी टीकात्मकपणे बोलावे, ती मनाला बदलण्याची चांगली मानसिक सवय ठरू शकते. काहीवेळा आपण राग धरून राहिलो आहोत का, कदाचित आपला राग पूर्णपणे न्याय्य असू शकतो, परंतु तो आपल्याला फक्त त्रासच देत असतो, हे समजून घेतले पाहिजे. संपलेल्या आणि केल्या गेलेल्या एखाद्या गोष्टीबद्दल आपल्याला अजूनही दोषी वाटते का, कदाचित ते सोडून देण्याची वेळ आता ह्या निवीन वर्षांत आली आहे, असे ठरवाता येऊ शकते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

## अंतरी कल्लोळ | शांत झाला |||

विठुचा गजर | सांगतो हा टाळ ||
सदासर्वकाळ | आत्मानंद ||१||
संतांच्या संगती | करीन मी वारी ||
तारील श्रीहरी | चिंता सारी ||२||
पाहिला सोहळा | चंद्रभागे तीरि ||
भक्तांचा कैवारी | विटेवर ||३||
टाळ-चिपळ्यांचा | अनाहत नाद ||
चैतन्याची साद | घाली वारा ||४||
मना नाम गोडी | लागली कृपेने ||
संत संगतीने | धन्य झालो ||५||
आता तुझ्या दारी | वाजवीता टाळ ||
अंतरी कल्लोळ | शांत झाला ||६||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८


## निरुपण

आधुनिक केसरी

ऐसीं बोलोन स्वार होये । मागुता फीरफिरों पाहे ।
वियोगदुःख न साहे । परंतु कांहीं न चले ॥ ३३ ॥
आपुला गांव राहिला मागें । चित्त भ्रमलें संसारौद्वेगें ।
दुःखवला प्रपंचसंगें । अभिमानास्तव ॥ ३४ ॥
ते समईं माता आठवली । म्हणे म्हणे धन्य ते माउली ।
मजकारणें बहुत कष्टली । परी मी नेणेंचि मूर्ख ॥ ३५ ॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

छिद्र मशक कैसे करो,
अग्नि नहीं धधकाय ।
वैसे इन्द्रिय चलन में,
बरत शिखा नहिं पाय ।।१२४।।
(स्वर्वेद षष्ठ मण्डल षष्ठ अध्याय)
०६/०६/१२४
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
भात्याला छिद्र पडल्यास त्याच्याद्वारे अग्नी प्रज्वलित होऊ शकत नाही, त्याचप्रमाणे इंद्रियं चंचल राहिल्याने ज्ञान-अग्नीची शिखा प्रदीप्त होऊ शकत नाही.



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## ब्रम्हनिरूपण

आधुनिक केसरी

शब्द व अर्थ मागे टाकून अनन्य होण्यास शिकावे. प्रथम शब्द ऐकावा तो समजून घ्यावा,मग त्याच्या अर्थाचे मनन करावे. मनन करता करता अर्थरूप होऊन अखेर दुधात जशी साखर विरघळते त्याप्रमाणे विरून जावे. तिथे शब्द निःशब्द होतात. मी पणाचा गर्व नाहीसा होतो. मी माझे हा अहंभाव कधीच नसावा. यासाठी विचारांची खूप मोठी व्यापकता असायला हवी तरचं हे शक्य होईल. जेव्हा प्रकृती व पुरूष दोन्ही लय पावतात या अनुभवाप्रमाणे पोहचलेला महापुरुष बोलला तरी त्याचे मौन भंग होत नाही.त्याने कर्म केले तरी तो वैचारिक बैठक मुळे सगळ्यात असला तरी कशातही नसतो. म्हणजेच तो ब्रम्हस्वरूपाला पोहचलेला असतो. यालाचं ब्रम्हज्ञान म्हणतात.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## नाम व भगवंत

आधुनिक केसरी

‘ राम राम ’ म्हणून राम कसा भेटेल या विचारण्यात काहीच अर्थ नाही. उलट असे म्हणता येईल की, ‘राम राम’ म्हटल्याशिवाय राम भेटणेच शक्य नाही. व्यवहारातही आपला हाच अनुभव आहे. समजा, आपल्याला एका गावाला जायचे आहे म्हणून आपण स्टेशनवर गेलो, आणि जिथे जायचे आहे त्याचे सर्व वर्णन केले पण नाव सांगता आले नाही, तर आपल्याला तिकीट मिळेल का ? उलट, त्या गावातली काही माहिती नाही पण नाव ठाऊक आहे, तर आपल्याला तिकीट मिळून तिथे जाता येईल. म्हणजे, ठिकाण माहितीचे आहे पण नाव तेवढेच न आठवले तर काहीही उपयोग होत नाही. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की, बाकी सर्व केले पण नाम नाही घेतले तर काही उपयोग होत नाही; म्हणून नाम घेणेच जरूर आहे. नामाने भगवंताची प्राप्ती होणार ही खात्री असावी. भगवंताच्या नामाची गरज दोन तऱ्हेने आहे : एक, प्रपंचाचे स्वरूप कळण्यासाठी, आणि दुसरी, भगवंताच्या प्राप्तीसाठी. खायला-प्यायला पोटभर, बायकोमुले, घरदार, वगैरे



सर्व गोष्टी असल्या तरीसुद्धा आपल्याला काळजी आणि तळमळ का असते हे आपल्याला कळत नाही. याचा अर्थ, दुःखाचे खरे स्थान कुठे आहे हे कळत नाही. ते कळण्याकरिता भगवंताच्या नामाची गरज आहे. भगवंताची तळमळ लागेपर्यंत नामाची जरुरी आहे; नंतर, भगवंतावाचून आपल्याला दुसरा आधार नाही म्हणून नाम घ्यायला पाहिजे; आणि शेवटी, भगवंताच्या दर्शनानंतर नाम सवयीने आपोआप येते. एकूण, आरंभापासून शेवटपर्यंत भगवंताचे नामच शिल्लक राहते. जो नामस्मरण करील आणि त्याचे अनुसंधान ठेवील त्याला भगवंताची जिज्ञासा आपोआप उत्पन्न होईल. नामाकरिता नाम घ्या, की त्यात राम आहे हे कळेल. नाम घेताना, जे घडेल ते चांगले आणि आपल्या कल्याणाचे आहे असा भरवसा ठेवा.भगवंताचे नाम हीच सच्चिदानंदस्वरूप सद्वस्तू होय. भगवंताच्या नामात जो स्वतःला विसरला तो खरा जीवन्मुक्त होय. जे काय साधायचे ते हेच. बाकीच्या गोष्टी स्वप्नासारख्या समजाव्यात. त्या प्रचीतीस येतात पण नसतात. देहाशी असलेले आपले तादात्म्य हे एक प्रकारच्या सवयीने आणि अभ्यासानेच झालेले आहे. याच्या उलट अभ्यास करून भगवंताचे चिंतन केले तर जसे आज देहाशी तादात्म्य आहे त्याचप्रमाणे भगवंताशी आपले तादात्म्य होईल.

**१२. सकाळी उठताना, रात्र निजताना, जेवायच्या आधी, नाम घ्यायचेच आणि भगवंताची आठवण करायचीच असा नियम करावा. तो आयुष्यात फार उपयोगी पडेल.**

## गहिनीनाथ

आधुनिक केसरी

गहिनीनाथाचा मातीच्या पुतळ्यापासून जन्म, मधुनाभा ब्राह्मणाकडून संगोपन कनकागिरी गावात मच्छिंद्राने गोरक्षनाथास उपदेश करून सर्व वेदशास्त्रांत प्रवीण केले, चौदा विद्याहि त्यास पक्क्या पढविल्या; सकल अस्त्रात वाकब केले, साबरी विद्या शिकविली व सर्व देवाच्या पायांवर त्यास घातले. नरशी, कालिका, म्हंदा, म्हैशासुर, झोटिंग वेताळ, मारुती, श्रीराम इत्यादिकांची दर्शने करविली. जेव्हा रामाची भेट झाली, तेव्हा रामाने गोरक्षनाथास मांडीवर बसवून आशीर्वाद दिले. असो बावन वीरांसहवर्तमान श्रीराम, सूर्य, आदिकरून सर्वांनी गोरक्षास वरदाने दिली व त्यास तपास बसविण्यासाठी मच्छिंद्रनाथांना सांगून ते आपापल्या ठिकाणी गेले. एके दिवशी गोरक्षनाथ संजीवनीमंत्र पाठ करीत बसले होते. जवळ मच्छिंद्रनाथ नव्हते. तो एकटाच त्या ठिकाणी बसला आहे अशा संधीस गावची मुले खेळत खेळत त्याच्या जवळ गेली. ती मुले चिखलाचा गोळा घेऊन आपसात खेळत होती. त्यांनी गोरक्षास चिखलाची गाडी करावयास सांगितले, पण त्याने आपणास गाडी करता येत नाही म्हणून सांगितल्यावर ती मुले आपणच करू लागली. त्यांनी चिखलाची गाडी तयार केली.

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
बुधवार, ३ जानेवारी २०२४



सामाजिक शिक्षिका-सावित्रीमाई फुले

पान 7



बाजार सावंगी : बाजार सावंगी येथील पेट्रोल पंपांवर पेट्रोल, डिझेल भरण्यासाठी लांबच लांब रांगा लागल्याचे दिसून आले. पेट्रोल पंपसाठी पेट्रोल डिझेल पुरवठा करणारे टँकरचालक संपावर जाणार असल्याच्या बातम्यांमुळे पेट्रोल डिझेल भरण्यासाठी वाहनधारकांची झुंबड उडाली. ग्रामीण भागात पेट्रोल पंपवर कधी नव्हे ती एवढ्या प्रचंड मोठ्या प्रमाणात वाहनांची गर्दी झाली होती. रात्री उशिरापर्यंत वाहनांची गर्दी होती.

# खेळाडूंनी घेतला ताडोबा सफारीचा आनंद

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** दि. २६ ते ३१ डिसेंबर या कालावधीत विसापूर येथील क्रीडा संकुलमध्ये झालेल्या ६७ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत २८ राज्य व केंद्रशासित प्रदेशातील १५५१ खेळाडू व ५०० प्रशिक्षक व व्यवस्थापक सहभागी झाले होते. सुधीर मुनगंटीवार, मंत्री, वने, सांस्कृतिक संचनालय व मत्स्य व्यवसाय, महाराष्ट्र राज्य यांच्या सूचनेनुसार सहभागी सर्व खेळाडू, प्रशिक्षक व व्यवस्थापक यांना ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या वतीने निशुल्क ताडोबा भ्रमंती करविण्यात आली आहे व ताडोबा वेलकम कीट भेट व आठवण म्हणून देण्यात आली आहे. यामध्ये ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाची T-शर्ट, कॉप, किचेन, ताडोबा माहिती पुस्तिका आणि ताडोबा डायरी मासिक देण्यात आले आहे. ही कीट प्रदान केल्यानंतर सर्व सहभागी खेळाळूंच्या चेहऱ्यावर आनंद द्विगीनीत होता आणि त्यांच्या मनोगतामध्ये याबद्दल त्यांनी व्यक्त केले आहे. दिनांक २५ ते डिसेंबर या कालावधीत सकाळी व दुपारच्या सफारी वेळेस सर्व खेळाडूंच्या सफारी करविण्यात आले आहेत. या खेळाडूंनी ताडोबा जंगल सफारीचा मनमुराद आनंद घेतला आणि वन्यप्राण्यांचे जवळून निरीक्षण करता आले. यामध्ये प्रत्यक्षात सर्वांनी प्रथमच वाघ पहिला आणि विशेषतः एक वाघ तलवामध्ये



पोहताना तर 3 वाघ एका वेळेस जवळून बघता आले तर काही विद्यार्थ्यांना सफरीच्या परतीच्या वाटेवर शेवटच्या क्षणात वाघाचे दर्शन झाले. यापलीकडे काळ्या बिबट्याचे सुद्धा दर्शन झाले. याशिवाय मोठ्या प्रमाणात चितळ, सांबर, गवे पाहता आले आणि विविध तलवामध्ये मगर सुद्धा बघितली. या सोबतच विविध प्रजातीचे पक्षी आणि वनस्पतीबद्दल समजून घेतले. या सर्व खेळाडूंना वनाचे व वन्यजीवांचे महत्व सुद्धा समजावून सांगण्यात आले. या जंगल सफारीमुळे सर्व सहभागी खेळाडू अत्यंत आनंदी झाले. त्यांच्या प्रत्यक्ष अनुभुवानुसार प्रथमच राष्ट्रीय स्पर्धेत खेळाडूनां ही सुविधा निशुल्क व आदरतिथ्यापूर्वक पूरविण्यात आली आहे असे कळले. सरते शेवटी सर्व सहभागी खेळाडू यांनी मा. सुधीर मुनगंटीवार, मंत्री वने, सांस्कृतिक संचनालय व मत्स्य व्यवसाय, महाराष्ट्र राज्य यांचे आभार व्यक्त केले. डॉ. जितेंद्र रामगावकर, वनसंरक्षक तथा क्षेत्र-संचालक, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प यांचे सुद्धा आभार व्यक्त केले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता सहभागी टीम ताडोबा मार्फत श्री. कुशाग्र पाठक, उपसंचालक (बफर) ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, श्री.नंदकिशोर काळे, उपसंचालक (कोर), ताडोबा-अंधारी व्या.प्र.,यांच्या मार्गदर्शनात श्री. अरुणकुमार गोंड, श्री. संतोष थिपे वनपरिक्षेत्र अधिकारी. श्री. प्रफुल्ल सावरकर,पर्यावरण शिक्षण अधिकारी, वन कर्मचारी आणि जिल्हा क्रीडा व्यवस्थापन टीमचे श्री. अविनाश पुंड, जिल्हा क्रीडा अधिकारी व श्री.संदीप उईके यांनी अथक परिश्रम घेऊन या कार्यक्रमांचे उत्तमरित्या नियोजन केले.





# उदय सामंत यांचा टोला

आधुनिक केसरी

मध्य प्रदेशात भाजपाला ८० जागा मिळतील असा सर्व्हे होता, राजस्थानमध्ये ७५ जागा मिळतील सर्व्हे होता. मात्र तिकडे भाजपाला उत्तम यश मिळाले. आम्ही लोकसभा निवडणुकीत ४८ जागा जिंकू असं उदय सामंत यांनी म्हटलं आहे. ४८ जागा महायुती जिंकणार आहे तर आमच्या समोर जी शिवसेना आहे उद्धव बाळासाहेब ठाकरे ती ४९ जागा जिंकेल असा टोला उदय सामंत यांनी लगावला. २०२४ मध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे ही शिवसेना क्रमांक एकचा पक्ष होईल असे वक्तव्य समोर आले. त्यावर विचारले असता उदय सामंत म्हणाले, स्वप्ने कुणीही पाहू शकते. मी असे म्हणू शकते मला बायडेन व्हायचं आहे. जे काही बोलतो त्यात तारतम्य असले पाहिजे. परवाच्या ज्या ग्रामपंचायतीच्या निवडणुका झाल्या त्यामुळे २३०० पैकी १७०० महायुतीने जिंकल्या. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकाही आम्ही जिंकल्या. आम्ही जर सगळ्याच निवडणुका जिंकतोय तर मला वाटते संजय राऊत यांनी स्वप्ने पाहावे काही हरकत नाही. असा टोलाही उदय सामंत यांनी लगावला. जागावाटपाचा निर्णय आमचे तीन नेते घेतील. जे काही योग्य असेल ते ठरवतील आमचे तिन्ही नेते तो निर्णय घेण्यासाठी सक्षम आहेत. आजपर्यंत आमच्या युतीत स्वयंघोषित कुणीही नाही. एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार जे ठरवतील ते महायुतीतल्या पक्षांनी मान्य केले पाहिजे. हे तिन्ही नेते योग्य पद्धतीने निर्णय घेतील असेही उदय सामंत यांनी म्हटले आहे. लोकसभा निवडणुकीत महायुतीला ४८ जागा जिंकाव्यात यासाठी आमचे तिन्ही नेते प्रयत्न आणि नियोजन करत आहेत. आमचे खासदार निवडून येतील असे उदय सामंत म्हणाले तसंच त्यांनी उद्धव ठाकरेंवरही बोचरी टीका केली. करोना काळात पीपीई किटमध्ये भ्रष्टाचार करणाऱ्यांनी भ्रष्टाचारावर बोलू नये. करोना काळात त्यांनी मेलेल्यांच्या टाळूवरचे लोणी खाल्ले आहे आणि आता आम्हाला हे सांगत आहेत असा टोला उदय सामंत यांनी उद्धव ठाकरेंचे नाव न घेता लगावला.

# सावित्रीबाईंच्या कवितेतील मूल्य विचार

आधुनिक केसरी

**सावित्रीबाई फुले यांनी आपल्या सासरी जेव्हा पाऊले ठेवले, त्यावेळी त्यांचे वय केवळ नऊ वर्षाचे होते. नायगाव या खेडेगावात जन्मल्यामुळे शिक्षणाचे संस्कार पाहिजे, तसे त्यांच्यावर पडू शकले नाही. त्या जेव्हा सासरी आल्या, तेव्हा त्या निरक्षर होत्या. आपणास लिहिता-वाचता यावे, ही इच्छाशक्ती. मात्र त्यांच्यामनात जाणीव होती, शिक्षणाने जीवन समृद्ध होते, याची जाणीव सावित्रीबाईंना पूर्वीच झाली होती. महात्मा फुले यांच्या सहवासाने तर त्यांच्या इच्छाशक्तीलाच चालना मिळाली. सावित्रीबाई हळूहळू बाराखडी शिकू लागल्या.**

जमिनीची पाटी आणि झाडाची काडी, लेखणी म्हणून घेऊन त्यांनी ज्योतिबांकडून शिक्षणाचे धडे घेतले. ३ जुलै १८५१ रोजी महात्मा फुले यांनी बुधवार पेठेतील भिडेवाड्यात स्त्रियांकरीता शाळेची स्थापना केली, तेव्हा सावित्रीबाईंना भारतातील पहिली महिला शिक्षिका बनविले. शिक्षिकेची जबाबदारी स्वतःकडे घेतल्यापासून सावित्रीबाईंच्या वाचनामध्ये वाढ झाली. त्यांचे चिंतन व मनन वाढले. समाजातील रूढी, परंपरा आणि धर्मांधता त्यांच्या डोळ्यासमोर उभी होती. मानवाकडून होत असलेला मानवाचा छळ त्यांनी पाहिला होता. त्यांच्या संवेदनशील वृत्तीला ते पटत नव्हते. समाजातील वास्तविकतेमधून त्यांची प्रतिभाशक्ती जागरूक होऊ लागली. स्पृश्य - अस्पृश्यांवर होणारे अन्याय थांबायला हवे, या भावनेतून त्यांचे विचार शब्दरूपाने आकार घेऊ लागले आणि त्यांच्या लेखणीतून हळूवारपणे कविता साकार होऊ लागली. समाजातील विसंगती, अत्याचार, प्रतारणा, अंधश्रद्धा, धर्मांधता यांच्या प्रत्यक्ष दर्शनाने त्यांच्या लेखणीतून ४१ कविता लिहून पूर्ण झाल्या. इ. स. १८५४ मध्ये त्यांचा 'काव्यफुले' हा पहिला काव्यसंग्रह पुण्याच्या मिशनरी छापाचे शिळाप्रेसवर प्रकाशित झाला. तेव्हा त्यांचे वय केवळ २३ वर्षाचे होते. सावित्रीबाई फुलेंच्या काव्यसंग्रहापूर्वी निघालेले बहुतेक संग्रह हे पारंपारिकता, धार्मिकता, संतवाङ्मय व चरित्र आधारित लेखन प्रेरणेतून प्रसवलेले होते. परंतु समाजजीवनाचे यथार्थ दर्शन आणि वास्तविकतेची प्रखर जाणीव आपल्या कवितेतून सर्वप्रथम सावित्रीबाईंनीच मांडली. परंपरागत पद्धती व रूढींच्या विरोधात सावित्रीबाई सदैव तत्पर असल्यामुळे त्यांच्या काव्याची प्रस्थापित समाजाने दखल घेतली नाही. समाज परिवर्तनाची तीव्र जाणीव आणि मानवता हे त्यांच्या कवितेचे श्रेष्ठ मूल्य होते. 'काव्यफुले'तील बहुसंख्य कविता सुधारणा, सामाजिकता व समता या विचाराला धरून लिहिलेल्या आहेत. इ.स. १८६६ मध्ये केशवसुत जन्मले. त्यांनी आपल्या बहुसंख्य कवितेमध्ये व्यक्तिस्वातंत्र्य, समता, आत्मविष्कार, सामाजिक दृष्टिकोन यांची मांडणी केली आहे. केशवसुतांनी लिहिलेल्या कविता त्या काळात अत्यंत गाजल्या. आत्मविष्कारामुळे कवितेला वेगळेच वळण लागले आणि केशवसुत नावारूपास आले. मराठी कवितेत नाविण्य व आधुनिकता ओतणारा पहिला कवी म्हणून त्यांना श्रेय प्राप्त झाले. मात्र केशवसुतांपूर्वी आत्मविष्काराची अभिव्यक्ती सावित्रीबाई फुलेंनी प्रखरपणे केली होती. परंतु याची दखल प्रस्थापित समाजाने घेतली नाही. 'काव्यफुले' मध्ये मांडलेले विचार हे केशवसुतांचा जन्म होण्याच्या १२ वर्षापूर्वीच सावित्रीबाईंनी मांडले असल्यामुळे काळाचा विचार केल्यास - 'नवकवितेच्या जननी' या सावित्रीबाई फुलेच ठरतात. त्यानंतर तेच विचार, तीच जाणीव, तोच आत्मविष्कार केशवसुतांनी आपल्या कवितेत मांडलेला दिसत असल्यामुळे त्यापूर्वी मांडलेल्या या अभिव्यक्तींची जननी सावित्रीबाई फुलेंनाच गौरवावे लागते. साहित्याचा इतिहास ठरवितांना स्थळ, काळ, परिस्थिती याचाही विचार होत असतो. सावित्रीबाई फुलेंच्या कविता या केशवसुतांपूर्वी लिहिलेल्या व समाज जाणीवेची प्रखर मांडणी केलेल्या होत्या, हे नाकारून चालणार नाही. 'द्रष्टा कवी', 'खुळे काव्य व खुळा कवी' या कवितेमध्ये त्यांनी काव्यनिर्मिती प्रक्रियेविषयीचा खोल व आधुनिक विचार मांडला आहे. कवी हा क्रांतीकारक असतो. समाजाला उत्स्फूर्त करणारा, प्रेरणा देणारा आणि जुन्या परंपरेचा विध्वंस करून नव्या मूल्याचे दर्शन घडविणारा असल्याचा विचार सावित्रीबाईंनी आपल्या कवितेत केशवसुतांपूर्वीच मांडला होता. 'इंग्रजी शिका', 'शिकणेसाठी जागे व्हा', 'अज्ञान', 'शुद्रांचे दुखणे' याकवितेमध्ये सावित्रीबाईंनी नावीन्याचा स्वीकार करण्याविषयीचा विचार मांडलेला आहे. तोच विचार पुढे केशवसुतांनीही आपल्या कवितेत मांडला. निसर्गविषयक सूक्ष्म दृष्टी देऊन लिहिलेल्या कविताही 'काव्यफुले' मध्ये संख्येने अधिक आहेत. निसर्गाच्या ठिकाणी मानवाला सुखी, आनंदी व दिव्य बनविण्याचे सामर्थ्य आहे, हा वेगळा दृष्टीकोन सावित्रीबाईंनी पूर्वीच मांडलेला होता. 'पिवळा चाफा', 'जाईचे फूल', 'जाईची कळी', 'गुलाबाचे फुल', 'मातीची ओवी', 'फुलपाखरू' व 'फुलाची कळी', 'मानव व सृष्टी' या कवितांमध्ये निसर्गविषयक प्रेम सावित्रीबाईंनी आपल्या कवितेत फार पूर्वीच मांडले होते. त्यानंतर केशवसूत व बालकवींनी त्यामध्ये भर घातली, हे विशेष! इ.स. १८५४ साली 'काव्यफुले' हा सावित्रीबाईंचा पहिला काव्यसंग्रह शिळा प्रेसवर छापण्यात आला. या संग्रहाच्या प्रास्ताविकात त्या म्हणतात, "अर्पित फुले ही तुम्हा सुगंधी साची । काव्यात ओवते माळ करूनिया त्यांची आहेत मजेची काव्यफुले ती सारी वासाने । तयाच्या शांति मिळे अंतरी'" स्त्रीसुलभ भावनांचा सहजाविष्कार 'काव्यफुले' मधून सावित्रीमाईंनी घडविला आहे. काव्य ही शब्दसाधना असून, आपल्या हातून काव्य लिहून व्हावे, असा त्या आशीर्वाद मागतात -

**"ज्याने गुण जगत मौलिक निर्मियले ज्याचे कृपे सकल ब्रह्मत्रिलोक डोले त्या शंभूला पुजुनिया वर मागते मी जिव्हेवरी बसुनि तू रचि काव्य नामी"**

आपल्या पूर्वपरंपरेच्या अभ्यासातून सावित्रीबाईंना काव्याचे माहात्म्य पटलेले आहे. म्हणून फार जाणीवपूर्वक त्यांनी कविता लिहिलेल्या आहेत. त्यांचे हौसेखातर नसून, समाजप्रबोधनाच्या उदात्त हेतूने त्यांनी ही 'काव्यफुले' मुक्त हस्ते उधळली आहेत. सावित्रीबाईंनी आपल्या काव्यातून निसर्गाचे सुरेख चित्रण केले आहे. 'माझी जन्मभूमी' ही कविता या दृष्टीने लक्षणीय ठरते. माझी जन्मभूमीच मला शब्दांची फुले करायला प्रेरणा देत असून, तीच मी मायभूमीवर उधळीत आहे, असे त्या सहज लिहून जातात. 'पिवळा चाफा', 'जाईचे फूल', 'फुलपाखरू' व 'फुलाची कळी'आणि 'मानव व सृष्टी' या कवितांतून निसर्ग व मानवाचे अतूट नाते कवयित्रीने वर्णिले आहे. या कवितेत त्या लिहितात - **"सुंदर सृष्टी सुंदर मानव सुंदर जीवन सारे सद्भावाच्या पर्जन्याने बहरूनी टाकू'वा' रे"**

भय, चिंतामुक्त होऊन इतरा जगवू आणि स्वतः जगू या हा धडा निसर्गापासून घेऊ या, असे सावित्रीबाई सांगतात. सावित्रीबाईंनी कविता लिहायला प्रारंभ केला. त्यावेळची परिस्थिती लक्षात घेणे आवश्यक आहे. त्यांची कविता ही समाजातील सर्वसामान्य माणसाची असल्यामुळे ती कल्पकतेपेक्षा वास्तविकतेकडे वळणे साहजिकच आहे. समाज प्रबोधनासाठी त्यांनी साहित्याचा उपयोग केला असल्यामुळे त्यांच्या कवितेवर काव्यात्मक दृष्टीने दोषारोपण करणे योग्य नाही. त्यांची कविता दीन-दलितांचे दुःख, व्यथा, अन्याय, विद्रोह मांडणारी आहे. त्यामुळे तिचे समीक्षण करतांना त्या काळातील परिस्थिती, प्रस्थापितांचे वर्चस्व, क्रांतीकारकवृत्ती यांचाही विचार करावा लागेल. आपला इतिहास, आपल्या पूर्वसूरींचे कार्यकर्तृत्व वर्तमान घडविण्यास नव्या पिढीसाठी आवश्यक असतात, हे सावित्रीमाई जाणून होत्या. म्हणून न्यूनगंडाने पछाडलेल्या बहुजन समाजाला त्या आपल्या पराक्रमी पूर्वजांचा इतिहास सांगतात, बळी हा शेतकऱ्यांचा राजा. त्याच्या राज्यात प्रजा सुखी होती. कुठेही भेदभाव नव्हता. परंतु कपटाने त्याचे राज्य बुडविले. 'बळीचे' स्तोत्र गाताना सावित्रीबाई म्हणतात "विंध्यावली बळिपल्ली । उभयता अभिजन मनोभावे बळिवंध्या । त्याचे गाऊ संकीर्तन पूर्वज आपले हेच । गुरू त्यांचे शुक्रानन त्यांना पदोपदी वंदू । वंशज त्यांचे आपण ।" बळीचा आदर्श सावित्रीमाई समाजासमोर ठेवतात. नंतरच्या काळात बळीराजाचे कार्य शिवरायांनी पूर्ण केले. म्हणून त्या लिहितात -

**"छत्रपती शिवाजीचे । प्रातः स्मरण करावे**
**शूद्रादि्र अतिशुद्रांचा । प्रभू वंदू मनोभावे"**

छत्रपती शिवरायांनी रयतेचे राज्य केले. केवळ शिवरायांचाच गौरव करून सावित्रीमाई थांबल्या नाहीत तर शिवराज्यातील बंडखोर नायिका ताराराणीचाही त्या गौरव करायला विसरत नाहीत. त्या लिहितात - **"ही एकच शूर रणगाजी छत्रपती ताराबाई शिवधनू प्रतापी माझी वीरांची रणदेवाई"**

बहुजनांच्या इतिहासातील महाप्रतापी स्त्रियांचाही त्यांनी गौरव केला आहे. खऱ्या इतिहासाचे कथन केले आहे. आपल्या पतीच्या कार्याबद्दल सावित्रीमाईंना रास्त अभिमान होता. त्या सांगतात "**माझ्या जीवनात । जोतिबा स्वानंद जैसा मकरंद । कळीतला ।।**" केवळ संसार सुखाचा केल्यामुळेच त्या जोतिबांना मानतात, असे नाही तर जोतीरावांचे समाजकार्य त्यांना जास्त भावतांना दिसते. त्या लिहितात - **"जोतिबांना नमस्कार । मनोभावे करतसे**
**ज्ञानामृत आम्हा देई । अशा जीवन देतसे**
**थोर जोति दीनशुद्रा । अतिशूद्रा हाक मारी**
**ज्ञान ही ईर्षा देई । तो आम्हाला उध्दारी"**

जोतिराव शूद्रातिशूद्र नरनारींचा उद्धारकर्ता आहे, म्हणून वंदनीय आहेत, असे सावित्रीमाई लिहितात.

माणूस असूनही पशुवत जीवन जगावे लागले. तुम्ही जरी आता स्वस्थ बसू नका. विद्या घ्या. इंग्रजी शिकण्याची ही संधी दडवू नका, असे त्या परोपरीने सांगतात. आम्हाला पशुपेक्षाही नीच पातळीवरचे जीवन जगावें लागले. असा कोणता शत्रू होता की ज्याने सर्व पातळ्यांवर आमचे जगणे नरकतुल्य करून टाकले? असे म्हणून मग त्याचे उत्तर देतात **"सांगते पहा दुष्ट शत्रूचे नाव नीट ऐका रे तयाचे अज्ञान धरूनि त्याला पिटायाचे आपल्या मधुनि हुसकायाचे !"** अशा प्रकारे अविद्या, अज्ञान घालवायचे आवाहन अनेक कवितांतून सावित्रीबाई करतात.

डॉ. प्रवीण बनसोड
जि. यवतमाळ, मो. 9423425129



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

# स्त्री शिक्षणाची गंगोत्री क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले

आधुनिक केसरी

**समाजसेविका, कवयत्री, लेखिका,पहिल्या महिला शिक्षिका, स्त्री शिक्षणाच्या जनक प्रतिकुल परिस्थिती मध्ये समाज सेवेच व्रत स्वीकारून स्त्री शिक्षणाचा ज्ञान यज्ञ आरंभ करत नव परिवर्तनाची यशस्वी क्रांती ज्यांनी घडवून तर आणलीच पण यशस्वी देखील केली. त्या शिक्षणाच्या गंगोत्री ज्ञान ज्योती सावित्रीबाई फुले यांनी पती ज्योतिराव फुले यांच्या समर्थ साथीने स्त्रियांसाठी शिक्षणाचं दालन उघडून दिलं आणि नव परंपरेचा बदलाचा आरंभ केला. देश पारतंत्र्यात होता समाजिक आर्थिक स्थिती तर बिकट होतीच पण समाजिक पातळीवर बालविवाह,अंध श्रद्धा,अशा रूढी परंपरा यांनी थैमान घातलं होत. त्यात आणखी भर म्हणून स्त्रियांना अबाधित अधिकर, सार्वजनिक जीवनात दुय्यम स्थान,शिक्षाणासह इतर अनेक अधिकारा पासुन वंचित ठेवलं जायचं.**

फक्त चुल आणि मुल एवढंच तीच विश्व आशा दयनीय परिस्थितीत अठराव्या शतकात क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांचा जन्म झाला.तो नारी शक्ति ला मुक्त करण्यासाठी आदर्श जीवन जगण्याची ताकद निर्माण होण्यासाठी मुक्त छंद स्वतःच अस्तित्व निर्माण करण्यासाठी पुरूषांच्या मागे नाही तर बरोबरीने पाऊल टाकण्यासाठी.जगाच्या तुलनेत भारतीय संस्कृती हि खूप प्राचिन असली तरी देखील काही अपवादात्मक स्त्रिया सोडल्या तर महिलांसाठी सामाजिक स्तरावर वातावरण फार काही पोषक नव्हतं.वेळेनुसार त्या त्या वेळी वेगवेगळी गणित लावत समाजव्यवस्था महिलांना दुय्यम ठरवतं गेली.संस्कार संस्कृती ची निर्माती स्त्री हिच मुळ शिक्षणापासून वंचित होती.शिक्षणाच्या मुख्य प्रवाहापासून वंचित स्त्रियांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी स्त्री शिक्षणाच्या क्रांतीची ज्योत पेटवली पाहिजे यासाठी समाजसेवक महात्मा ज्योतीबा फुले यांनी पत्नी सावित्रीबाई फुले यांना शिक्षण दिलं साक्षर केलं आणि सावित्रीबाई फुले यांच्या माध्यमातून पुण्यात स्त्रियांची पहिली शाळा मुर्त स्वरूपास आणली.कालतराने हिच ज्योत मशालीत रूपांतरित झाली आणि पाहता पाहता पुण्यात चालू झालेली स्त्री शिक्षणाची क्रांती हि देशाच्या कानाकोपऱ्यात पोहचली.अहोरात्र मेहनत प्रचंड संघर्ष करताना अवहेलना वाट्याला आली तरी देखील स्वतःच्या संसाराची तमा न बाळगता आपल्या पतीचा आदेश शिरसावंद्य मानून स्वतःला समाजसेवेसाठी झोकुन देणारया महान समाजसुधारक, समाजसेविका,शिक्षण तज्ज्ञ, कवयित्री,पहिल्या महिला शिक्षिका,खरया अर्थाने महिलांच्या शिक्षणाचा जगार करणार्या शिक्षणाच्या गंगोत्री म्हणून आपण ज्यांना संबोधतो त्या सावित्रीबाई फुले ह्या युगप्रवर्तक होत्या.युग परिवर्तन करण सहज नसतं.वेळ प्रसंगी दगड धोंडे चिखल माती सुद्धा अंगावर घ्यावी लागते.आणि अपमान नकारात्मक न घेता तो प्रसाद समजून मार्गक्रमण कराव लागत.जगातील कोणतही कार्य आरंभ करताना सुरवातीला कठिणच असतं खडतर असतं. स्त्री शिक्षणाचा आरंभ हा पाहिजे तितका सोपा आणि सहज नव्हता.स्त्री शिक्षण हे काळाची गरज आहे.पण परिवर्तन बोलून घडत नाही त्यासाठी कृती गरजेची आणि ते सुद्धा आरंभ स्वतः पासून झाला तर ते परिवर्तन क्रांतिकारक ठरत.हेच काळाचे पाऊल ओळखून ज्योतीराव फुले यांनी प्रथम पत्नी सावित्रीबाईंना शिक्षित केले पुणे येथे पहिली महिलांची शाळा काढत स्त्री शिक्षण हि उद्याच्या युगाची खूप मोठी गरज आहे हे काळच पाऊल ओळखत सावित्रीबाई यांच्या माध्यमातून इतर महिलांसाठी शिक्षणाचा मार्ग मोकळा केला.वेळ काळ आणि परिस्थिती विरोधात असताना देखील निस्वार्थ भावनेने समाजसेवेसाठी योगदान देताना अवहेलना अपमान तिरस्कार याची चिंता न करता समर्पित भावनेने आपल कार्य पुढे घेऊन जाणं हे सहज सोप नव्हत. तात्कालिन रूढी परंपरा याला थेट छेद देतान अनेक अडचणी पण ओढवल्या पण धेय्य वेडी माणसं फक्त धेय्य वर लक्ष केंद्रित करतात आणि यशाल गवसणी घालतात.आपल्या आध्यत्मिक परंपरे नुसार गंगा हि भगिरथ यांनी प्रथम पृथ्वी वर आणली असली तरी देखील बहुजन समाजात शिक्षणाची ज्ञान गंगा घरोघरी पोहचवली ती राष्ट्र संत भगवान बाबा यांनी म्हणून बहुजन समाजात शिक्षणाची ज्ञान गंगा घरोघरी पोहचवणारे भगिरथ म्हणून संत भगवान बाबा यांचा उल्लेख होतो.तर याच महाराष्ट्राच्या मातीत शिक्षणाची गंगोत्री म्हणून जयांचा उदय झाला त्या सावित्रीबाई ज्योतिराव फुले यांनी स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली.म्हणून त्या स्त्री शिक्षणाच्या गंगोत्री आहेत.साधारण अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात देशात इंग्रजी सत्तेविरुद्ध प्रचंड असंतोष पेटुन उठला होता. छोडेभारत चळवळ दिवसेंदिवस गतीमान होत होती.स्वातंत्र्य लढा यशाच्या दिशेने मार्गक्रमण करत होता याच वेळी एका बाजूला समाज सुधारणा हि सुद्धा काळाची गरज होती.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * ( * According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# आपण इतरांच्या किती कामी आलो यावर तुम्ही कसे जगला हे ठरते

## नववर्षात जन्मलेल्या मुलींचे स्वागत तर निराधारांना गोड जेवण देऊन पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** दुःख प्रत्येकाच्या आयुष्यात असते. आहे त्या परिस्थितीमध्ये आनंद मानून आपल्यापेक्षा दुःखी असणाऱ्यांच्या चेहऱ्यावर हास्य निर्माण जो करतो तो खऱ्या अर्थाने आनंदी जीवन जगतो. आपण इतरांच्या कामी किती आलो यावर तुम्ही कसे जगला हे ठरते असे प्रतिपादन अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त जिव्हाळ बेघर निवारा केंद्रामध्ये सत्कारमुर्ती वसंत मुंडे यांनी केले.
महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांचा वाढदिवस आणि नववर्षाचे स्वागत 1 जानेवारी रोजी सामाजिक उपक्रमातून करण्यात आला. बीड येथील जिल्हा सरकारी रूग्णालयात जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक बडे, वैद्यकीय अधिकारी डॉ.एच.डी.पारखे, पत्रकार संघाचे विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी, संपादक शेखर कुमार, पत्रकार शेख वसीम, हरिदास तावरे आदिंची प्रमुख उपस्थिती होती. जिल्हा शल्यचिकित्सक यांनी वसंत मुंडे यांचा यथोचित सत्कार करून जन्मदिनी नववर्षाच्या प्रथम दिनी ज्या मुलींचा जन्म झाला त्यांच्या कुटूंबियांना मिठाई वाटून मुलींचे स्वागत केले. अशा स्वागताने मुलींचा जन्मदर वाढेल आणि त्यांचे समाजातील महत्वसुध्दा वाढेल अशा उपक्रमाचा सर्वांनीच आदर्श घेणे गरजेचे आहे. असे मत व्यक्त केले. यावेळी जिल्हा रूग्णालयामध्ये ज्या मुलींचा जन्म 1 जानेवारी रोजी झाला त्यांना मिठाई वाटप करून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. धर्मवीर प्रतिष्ठाणचे अध्यक्ष तथा मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे साहेब यांचे विश्वासू बाजीराव चव्हाण यांच्या संपर्क कार्यालयात पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे यांचा वाढदिवसानिमित्त सन्मानपत्र देवून सन्मान करताना धर्मवीर प्रतिष्ठाणचे पदाधिकारी डॉ.ज्ञानेश्वर जाधव, शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष बीड जिल्हाप्रमुख महादेव मातकर, आरोग्यदुत मुंबईचे संपादक बाबा श्रीहरी देशमाने, दै.दिव्य लोकप्रभाचे संपादक संतोष मानुरकर, दैशसमर्थ राजयोगचे संपादक वैभव स्वामी, वैद्यकीय सहाय्यक कृष्या यादव आदिंची उपस्थिती होती.



बीड येथील जिव्हाळा बेघर निवारा केंद्रामध्ये केक कापून पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांचा निराधार केंद्राच्यावतीने सत्कार करण्यात आला. तर वाढदिवसानिमित्त पत्रकार संघाच्यावतीने निराधार केंद्रातील सर्व लाभार्थ्यांना गोड जेवण देण्यात आले. यावेळी सत्कारमुर्ती वसंत मुंडे पुढे बोलताना म्हणाले, आयुष्यात जे काही कमवायचे ते इथेच ठेवून जायचे आहे. त्यामुळे द्वेष, मत्सर करत बसण्यापेक्षा आपणही सन्मानाने जगावे आणि इतरांनाही जगू द्यावे इतकेच साधे तंत्र आयुष्यामध्ये जपले तर दुःख फारसे वाटेला येणार नाही. या जगात सर्व सुखी असा सापडूनही सापडणार नाही. आज याठिकाणी जे निराधार केंद्राच्या आश्रयाने थांबलेले आहेत त्यांना असे वाटत असेल की आयुष्यातील सर्व दुःख आपल्याच वाटेला आले आहे पण वास्तवात तसे नाही. जे गर्भश्रीमंत आहेत त्यांचासुध्दा जो शेवट आपण काही जणांचा पाहतो त्यावेळी या जगात दुःख प्रत्येकाला आहे याची जाणिव होते. त्यामुळे तुम्ही देखील दुःखी न राहता आहे त्या परिस्थितीवर मात करत एकमेकांना आनंद, सुख देण्याचा प्रयत्न हाच आपल्या जिवनाचे खरे संचित पुण्य आहे असे म्हटले तर वावगे ठरू नये असे मत व्यक्त केले. यावेळी सहाय्यक पोलिस निरीक्षक राजु गुळभिले यांच्यासह दै.दिव्य लोकप्रभाचे संपादक संतोष मानुरकर, दै.समर्थ राजयोगचे संपादक वैभव स्वामी, युवा नेते राणा चौव्हाण, सेवानिवृत्त मुख्याध्यापक गायकवाड, जिव्हाळा केंद्राचे व्यवस्थापक राजु वंजारे, संचालक अभिजीत वैद्य यासह लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी मनोगत व्यक्त करून पत्रकार वसंत मुंडे यांना शुभेच्छा देत या सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले.



## नांदा तांडा येथे विकसित भारत संकल्प यात्रा कार्यक्रमाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील नांदा तांडा येथे विकसित भारत संकल्प यात्रेचे आयोजन दि.३१/१२/२३ रोजी सरपंच वरदानसिंग चव्हाण व महिला मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आले आहे.शासनाच्या विविध योजना गरजू नागरिक पर्यंत पोचवण्यासाठी केलेला हा उपक्रम कार्यक्रम अभिनंदनीय आहे.सामान्य जनतेला दिलासा देण्यासाठी मोदी सरकारने पुढं टाकलेल एक पाऊल आहे.
यावेळी सरपंच वरदानसिंग चव्हाण,भाजपा VJNT प्रदेश उपाध्यक्ष जयप्रकाश चव्हाण, कवरसिंग भाऊ, मोरसिंग चव्हाण माजी सरपंच,प्रकाश राठोड सोना राठोड,देवीदास चव्हाण,मोहनदास राठोड रोहिदास राठोड, रामदास राठोड, गुरुमुख जाधव , गुरुमुख राठोड, अरूण चव्हाण,यांच्या सह सर्व ग्रां स तसेच ग्रामपंचायत सदस्य,ग्रामसेवक, आशासेविका, वैदिकिय कर्मचारी, व गावातील नागरिक मोठ्या संख्यने उपस्थित होते..

## पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांच्या आदेशावरून पोलीसांची दमदार कामगिरी

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** पोलीस अधीक्षक धुळे श्रीकांत धिवरे यांच्या आदेशान्वये दि- ३१/१२/२०२३ सन २०२३ च्या अखेरच्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक धुळे यांनी सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी व शाखा अधिकारी यांना सूचना देऊन धुळे जिल्ह्यात ठिकठिकाणी नाकाबंदी करून फरार व पाहिजे आरोपींना अटक करणे, अवैध शस्त्रांवर कारवाई, अभिलेखावरील गुन्हेगार, हिस्ट्रीशिटर अँण्ड ड्राईव्ह केसेस करणे, संशयित वाहनांची तपासणी करून कारवाई करण्यात आल्या. अशाप्रकारे एकूण ३२८ कायदेशीर कारवाया करून एकूण १२,५४,२३५ रू किं. ची दंड रक्कम व मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे त्यात शिरपूर पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक यांनी देखील दमदार कामगिरी केली असून राजस्थान येथील एका आरोपींकडून गोपनीय माहितीदारा मार्फत शिरपूर बसस्थानक परिसरातून राजस्थान येथील रहिवासी प्रयागसिंह देवसिंग जोधा वय २७ याच्या कडून दोन गावठी बनावटीचे पिस्तूल व ५ जिवंत काडतुसे जप्त केली.




## पत्नीचा छळ करणाऱ्या अभियंत्याला कारावास

आधुनिक केसरी न्यूज

**मालेगाव :** सदनिका घेण्यासाठी माहेरून २० लाख रुपये आणावेत, यासाठी पत्नीचा छळ केल्याप्रकरणी संगणक अभियंता शमशुद्दीन पिंजारीला येथील न्यायालयाने तीन वर्ष सश्रम करावास, २० हजार रुपये दंड ठोठावला आहे. धुळ्याचा रहिवासी असलेला शमशुद्दीन आणि मालेगाव येथील फरहिन यांचा २०१३ मध्ये विवाह झाला होता.

उभयतांना मुलगीही आहे. संगणक अभियंता असलेल्या शमशुद्दीनने पुणे येथे सदनिका घेण्यासाठी माहेरहून २० लाख रुपये आणावेत म्हणून फरहिनकडे तगादा लावला. परंतु, ही मागणी पूर्ण न झाल्याने सासरच्यांकडून अनन्वित छळ सुरू झाल्याची तक्रार फरहिनने केली होती. या तक्रारीनुसार २०१६ मध्ये येथील आयेशानगर पोलीस ठाण्यात पती शमशुद्दीनसह अन्य सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. या खटल्याची सुनावणी येथील अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी तेजवंतसिंग संधू यांच्या न्यायालयात पार पडली. पत्नीचा छळ केल्याचा गुन्हा शाबित झाल्याने न्यायमूर्ती संधू यांनी पती शमशुद्दीनला तीन वर्षे सश्रम करावास व २० हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावली.



# निरंकारी संतसमागम : विश्वशांती, मानवतेचा संगम!



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**माणसाच्या हृदयापासून निघणारे वचन आणि त्यानुसार होणारे कर्म यांत समानता दिसून आली पाहिजे. तो कधी कधी अत्युत्साहाने मुखावाटे अशक्यप्राय गोष्ट बोलून जातो. मग मात्र बोलल्याप्रमाणे कृती करण्याची मुळात त्यात क्षमताच नसते. त्यामुळे त्याचे बोल "बोल बोल नुसतं कांद्यांचं फोल" सिद्ध होतात. आपण जसं बोलू तसं वागू, यास्तव पाठीवर सर्वशक्तिमान पाठीराख्याचा हात असावा लागतो. असा सर्वशक्तिमान पाठीराखा जगात सद्गुरूशिवाय दुसरा कोण असू शकेल?**

सद्गुरू प्रेरित हदयस्थ भाव हे अतिशय कळवळा, तळमळ, आत्मविश्वास, आत्मभान व आत्मियता यांचे उद्घोषक ठरतात. त्यांत एक प्रकारचा आव नसतो तर तडफदार ताव असतो. ही अंतरात्म्यातून निर्माण झालेली एक महान शक्ती असते. तिलाच जगाच्या मालकाने, आपल्या सद्गुरू माता सुदीक्षा सविंदर हरदेवजी महाराजांनी आत्मिकता म्हणून संबोधले आहे. पुढे जाऊन ती अंतर्मनातील शांती सिद्ध होत असते. अशी आत्मिकता व शांती ज्या ज्या महापुरुषांच्या अंगांगात भिनली त्या त्या महापुरुषांची पाऊले मानवतेच्या मार्गावर आपोआप चालू लागली आहेत. वेगळा असा मानवता मार्ग चोखाळण्याची, साकारण्याची किंवा आखण्याची काहीही गरज नाही, असे दासाला वाटते. कोणत्याही व्यक्तीला धरून-बांधून, मारून-मुटकून तिच्यात आत्मिकता रूजविता येत नाही. जो वर्तमान पैगंबर- समर्थ सद्गुरूला शरण जातो, तोच सद्गुरू कृपेने आत्मिकता बरोबरच खडतर अशा मानवता मार्गावर आपोआपच आनंदाने चालू लागतो. यासाठीच ग्रंथकार शहंशाह अवतारसिंहजी महाराज फर्मावतात-"**सच्ची मंज़ल सच्चा मारग हर बन्दे नूं भुल्ला ए| कहे अवतार गुरु दा एह दर हर बन्दे लई खुल्ला ए|"(सम्पूर्ण अवतार बाणी: पद क्र. ३५७)**

आपुलकी, प्रेम, नम्रता, दया, क्षमा, शांती आदी दैवीगुणांमुळे आत्मिकता अधिक प्रबळ आणि श्रृंगार चढविल्याप्रमाणे सुंदर होते. आत्मिकतेच्या अंतःप्रेरणेच्या बळावर म्हणजेच आंतरिक तळमळीने दास सचेत करत आहे. यात मानवता वा माणुसकीच्या नात्याचा ओलावाही अंतर्भूत आहे. लोक कोणाच्याही चोपड्या-चोपड्या गोष्टींवर भुलून- भाळून आंधळेपणाने कसाही गुरू करतात. पूजापाठ, होमहवन, मंत्रतंत्र, जारणमारण, जादूटोणा किंवा इतर क्रियाकलाप सांगणारा गुरू करतात. संपत्ती, संतती व आयुरारोग्य यासाठीच आपला जन्म समजतात. यांत मानवी जीवनाचा मूळ उद्देशच बाजूला राहतो. ईश्वरप्राप्ती हाच तो खरा मूळ उद्देश आहे. आपण त्यांच्याजवळ देव पाहण्याची इच्छा व्यक्त केली, तर ते वेळ मारून नेतात. ते प्रांजळपणे कबुली देतात, "आजवर देवाला कोणीच पाहू शकले नाही, मग मी तरी कसा बघेन? मी प्रयत्नरत आहे." अर्थात- मी जागतच आहे; तसे तुम्हीपण जागतच रहा! असाच काहीसा अर्थ निघतो. माघार न घेता ते पुढे सांगतात, जप, तप, व्रत, उपवास, शिर मुंडन, देह दंडन करत रहा. पूजापाठ, मंत्रोच्चार, होमहवन, आदी करत रहा, दरम्यान तुम्हाला साक्षात्कार होईल. स्वप्नामध्ये देव दर्शन देईल. हे सर्व उपद्व्याप आहेत, ते सर्व भ्रम, भ्रांत, खोटे आणि फसवणूक करणारे उद्योग आहेत. यात आपले सोन्यासारखे जीवन व वेळही बरबाद होत असते. तो हा परब्रह्म विठ्ठल ब्रह्मदर्शी- ब्रह्मवेत्ता सद्गुरू प्राप्त झाल्याशिवाय खऱ्या विराटरुपात दिसेलच कसा? संत महात्म्यांनी अभंगवाणी व संतवचनांद्वारे सांगितले आहे, की देवाला पाहता, जाणता, मानता व पुजता येतो. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींनी म्हटले आहे-

**"हरि पाहिला रे, हरि पाहिला रे।
हरि येथे रे, हरि तेथे रे।
हरि विण स्थान नाही रिते रे।
सबाह्यांतरी अवघा व्यापक मुरारी।।"**

कोण म्हणतोय, ईश्वर पाहण्यासाठी संपूर्ण आयुष्य वाया दवडावे लागते म्हणून... भगवान श्रीकृष्णाने धनुर्धर अर्जुनास एका क्षणार्धात- डोळ्याची पापणी झाकून परत उघडत नाही एवढ्या वेळात आपले विशालरूप दाखविले होते. मग हे खोटे म्हणावे का? हे खरे आहे, म्हणत असाल; तर याचा प्रत्यय आपण घेऊ शकत नाही का? अवश्यच घेऊ शकतो. आपण डोळसपणे- डोळे उघडे ठेऊन सद्गुरू केला पाहिजे. "तो म्हणाला म्हणून मी गुरू केला." अशी भूमिका आपल्या सर्वनाशास कारण ठरते. गुरूला आपणच कसोटीवर तपासून घेऊन नंतरच त्यास आपल्या हृदयात सद्गुरूस्थानी विराजमान केले जावे. स्वामी विवेकानंदजींनी तब्बल चोवीस गुरूंना कसोटीच्या तत्वांवर चाचपून पाहिले व नंतर पिटाळून लावले. रामकृष्ण परमहंस यांनी त्यांच्या सर्व प्रश्नांची समाधानकारक उत्तरे दिली. म्हणून त्यांना आपल्या हृदयात सद्गुरूस्थानी विराजमान केले. त्यांच्या कृपाशीर्वादाने त्यांनी आत्मिकतासह मानवतेची डगर सहजच सर केली. त्यांनी "आलं उतू अन् घातलं चाटू" अशी घाई, गडबड कधीच केली नाही. आपल्यालाही त्याच तत्वांच्या आधाराने सद्गुरू- परमगुरू शोधणे अत्यावश्यक आहे. स्वामी विवेकानंदजी तथाकथीत गुरूंना तीन प्रश्न विचारत होते. तेच तीन प्रश्न आपणही उपयोगात आणलेच पाहिजे. दासाने सुद्धा प्रथम याच तत्वांच्या कसोटीने निरंकारी ब्रह्मज्ञान घेतले. कुणीतरी सांगितले आणि दास लगेचच फसी पडला, नादी



लागला किंवा फंदी झाला, असे मुळीच नाही. ते प्रश्न असे- १) या जगात देव आहे का? जर उत्तर- आहे, तर पुढचा प्रश्न- २) तुम्ही देवाला पाहिले का? जर उत्तर- होय, तर पुढचा प्रश्न- ३) मला दाखवू शकाल का? जर उत्तर- होय, असेल तर तोच आपला सद्गुरू मानावा. त्याचे चरण धरून त्यास अनन्यभावाने शरण जावे आणि त्याचेकडून ब्रह्मज्ञान घ्यावे अर्थात ईश्वरप्राप्ती- देवदर्शन म्हणजेच देवाची ओळख पटवून घ्यावी. तेव्हाच आपणास पुढील संतवचन सत्यवचन वाटेल- **"मागे उभा मंगेश, पुढे उभा मंगेश! माझा देव माझ्याकडे पहात आहे!"** निरंकारी मिशनच्या विश्वबंधुत्व अभियानात जगातील सर्व जाती, धर्म, पंथ, वर्ण आदी वैविध्याची कोणीही व्यक्ती निःसंकोचपणे प्रवेश घेऊ शकते. मात्र तत्पूर्वी निरंकारी ब्रह्मज्ञान सहकुटुंब प्राप्त करणे अगत्याचे ठरते. दूधपित्या बालकांपासून तर सर्व वयोगटातील स्त्रीपुरुषांना ब्रह्मज्ञान घेण्यास काहीच आडकाठी नाही. वरील सद्गुरू पडताळ्याचे प्रश्न छोटे बालक वगळून परमपिता परमात्म्याविषयीच्या ज्ञानावर जे सांगु, बोलू वा चर्चा करू शकतात, अशा निरंकारी बंधुभगिनींना विचारावेत. ते आपणास वरील तीनही प्रश्नांची चटकन उत्तरे देऊ शकतात. मात्र तिसऱ्या प्रश्नाच्या प्रत्यक्ष कृतियुक्त उत्तरासाठी मंडळाच्या मान्यताप्राप्त ज्ञानदाता- ज्ञानप्रचारक महात्मा किंवा भगिनी यांच्याकडे घेऊन जातील. तेथे आपल्याला काही आढेवेढे न घेता, काही काळ वाट पाहण्यास न लावता तत्क्षणी देवदर्शन घडविले जाते. म्हणून संतवचनाप्रमाणेच दासाला सुद्धा भरकटत जाणाऱ्या किंवा तटस्थ लोकांविषयी आत्मिक कळवळा दाटून येतो. युगदृष्टा बाबा हरदेवसिंहजी महाराज म्हणतात-

**"मानवता की नेक डगर से भटक गया इन्सान क्यों। अपने संग औरों की हानि करता है नादान क्यों। सन्तों का रस्ता सुगम है उस पर बन्दे चलता चल। कहे 'हरदेव' मिलेगी मंज़िल पग पग आगे बढ़ता चल।" (सम्पूर्ण हरदेव बाणीः पद क्र. १५४)**

दास हरिच्या लाडक्या भक्तांना विनंती करतो, की बांधवांनो, मानव जन्माचे सार्थक करण्यासाठी डोळसपणे सद्गुरू करावा जी! कारण ब्रह्मज्ञानी संत महापुरुषांच्या घरी विठ्ठल परब्रह्म स्वतः राबत असत, हे आम्ही संतचरित्रांतून वाचत आलोत. दासाला ती चमत्कारिक गोष्ट खोटीच वाटत होती. विठ्ठल परमात्म्याने संतघरी झाटलोट, दळणकांडण, उष्टेखरकटे काढले. संतांचे बाळंतपण केले, सासुरवाशीण सुनेच्या रुपाने पतीसेवा केली. हे सगळे आता सत्य पटू लागले आहे. दासाची पत्नी- गृहलक्ष्मी संत आशाताई आपले अवतारकार्य संपवून ब्रह्मलीन झाली. तेव्हा वाटले होते, की देवाची अवकृपा झाली, घरात राबती- नांदती लक्ष्मी निघून गेली. पण नाही, तीच्या ऐवजी लक्ष्मीची अनेक रुपे आपल्या घरी पाणी भरू लागली आहेत. दासाची मामी संत अहिल्याबाई गुरनूले, मेहुण्या ब्रह्मज्ञानी संत उषाताई मोहूर्ले, संत चंदाताई लेनगुरे, संत दर्शनाताई निकुरे आणि संत मीराताई चोपकार या अडचणीच्या प्रसंगी वेळोंवेळी धावून येत आहेत. पाणी, धुणे, भांडी, केर काढणे आदी स्वच्छतेची कामे करत आहेत. ती त्यांची दैवीरुपे नाहीतर आणखी काय म्हणावी? त्यांच्या रुपाने आदिशक्ती महामाया लक्ष्मी आपल्या घरी आठदहा दिवसांच्या फरकाने येत आहे. राबत आहे, कष्टत आहे, नांदत आहे. म्हणून जगद्गुरू संत तुकाराम महाराजांनी म्हटले-"**बुडते हे जन, देखवेना डोळा। म्हणोनि कळवळा येत असे।**"

दयाळू, कृपाळू व ममतामयी संतांची ती लक्ष्मीरुपे आम्हां दोघे बापलेकांना जराही एकाकी वाटू देत नाहीत. खरेच, आम्ही किती भाग्यवंत नाही का? कारण दासाच्या घरी प्रत्यक्ष परमेश्वर- देव- निरंकार अनेक लक्ष्मीरुपाने राबत, कष्टत, नांदत आहे. आज नवागत सूनबाई- पल्लवीताई आली आणि तिने नवेजुने एक करत घराला घरपण आणले. त्या सर्व लक्ष्मीरुपांना आपले दंडवत प्रणाम! हेही उदाहरण संतांतील आत्मिकता, अंतर्मनाची शांती व त्यासोबतच मानवता अशी घट्ट रुजलेली सुस्पष्टपणे दृष्टीस पडते. मग सांगा, याहून साधासोपा दृष्टांत तो कोणता?

निरंकारी जगताच्या सांप्रत सद्गुरू माता सुदीक्षाजी महाराज यांनी कृपा केली आणि महाराष्ट्राचा ५७वा वार्षिक निरंकारी संतसमागम आपल्या ईलाक्यात, मैदान सेक्टर-१४-१५, पतंजली फूड फॅक्टरीजवळ, समृद्धी महामार्ग स्टार्टिंग पॉईंट जवळ, सुमठाणा, मिहान, नागपूर येथे आयोजित केला आहे. येथील समागम शिर्षक "अंतर्मनाची शांती" असा ठेवला आहे. मानवतेचा महाकुंभ- भव्यदिव्य रूपातील संतमांदियाळी- निरंकारी संतसमागम दि.२६ ते २८ जानेवारी २०२४ दरम्यान होऊ घातला आहे. प्रत्यक्षात संतसमागम मिळणे, ही फार दुर्मिळ अशी सुवर्णसंधी असल्याचे शास्त्र व पुराणांत म्हटले आहे. आपण यात सम्मिलीत होऊया आणि ब्रह्मानंदास पात्र ठरुया. त्याचे सिधे प्रसारण निरंकारी वेबसाईट आणि युटुबवर दररोज दु.२:३० ते रात्री ९ वा.पर्यंत होईल. यातील संतवचनामृताचा लाभ हरिभक्तांना घेता येईल. जशी हरवलेली अमूल्य वस्तू सांपडत नाही, तोवर मन थाऱ्यावर नसते. मनाला चैन पडत नाही आणि समाधान पावत नाही, एकदा ती सांपडली तर फार बरे वाटते, मनाला खूप समाधान वाटते. तशीच हरिभक्तांना हा समागम सोहळा पाहून अंतर्मनाची शांती नक्कीच प्राप्त होईल, अशी आशा आहे. म्हणून संपूर्ण समागम प्रसारण अगत्यानेच बघावे जी, ही विनंती!

# काळ कधीच बदलत नसतो.....



किरण डोंगरदिवे
संपर्क क्र. 7588565576

आधुनिक केसरी

**एकविसाव्या शतकातील 24 वे वर्ष सुरू होत असताना मागे वळून पाहणे किंवा पुढील भविष्याचा वेध घेणे तेवढे सुखकर कसे वाटत नाही? नवीन वर्ष येणार ही भावना आज पासून पंधरा ते वीस वर्षांपूर्वी जितकी उत्सुकता वाढवणारी होती तेवढी उत्सुकता आज वाटते का? याचे उत्तर फार प्रामाणिकपणे शोधले तर नकारार्थी येते. नेमके काय झाले? ते कळत नाही. पुढे काय होणार? ते माहित नाही. बेरोजगारांची एक मोठी फौज तयार होत आहे. सरकारी नोकऱ्या संपुष्टात येत आहेत. इंजीनियरिंग करणारे अनेक तरुण दहा ते बारा हजार रुपये महिन्याने वेठबिगारी काम करण्यास सज्ज झाले आहेत.**

एखाद्या कार्यालयातील चपराशी पदासाठी एम ए झालेले लोक अर्ज करत आहेत. बी ए एम एस झालेले तरुण डॉक्टर मल्टी हॉस्पिटलमध्ये कंपाउंडरच्या बरोबरीने पगार घेत काम करत आहेत. मध्यमवर्गीय घरातून एम बी बी एस झालेला डॉक्टर स्वतःचा दवाखाना टाकण्यासाठी किती एकराचा सातबारा कोरा करतो? असा प्रश्न उपस्थित होत आहे. ज्या देशात 15 पासून 50 लाख रुपये हुंडा दिल्याचे अभिमानाने सांगितले जाते तो देश स्त्रियांना किती मानसन्मान देत असेल हे वेगळे सांगण्याची गरज नाही. वयाच्या तीस वर्षापर्यंत तरुण आणि वयाच्या 25-26 पर्यंत तरुणींच्या लग्नाचा विचार करू नाही त्यामागे स्वतःची कमाई सुरू न होणे हे महत्वाचे कारण आहे. त्यातही लग्न याबाबतीत आई वडिलांचे न ऐकून स्वतःच्या मनाने निर्णय घेणारे 90 टक्के जोडपी दोन वर्षात घटस्फोट घेऊन मोकळे होत आहेत. एकंदरीत भविष्यातील सर्वच चित्र फार चिंतनीय आणि विचारणीय आहे. मात्र हा विचार वय वर्ष 40 च्यावर असलेली पिढी करत आहे. आणि ज्यांचे भविष्य पूर्ण अंधारात आहे ते मात्र निव्वळ मोबाईलवर व्हाट्सअप आणि फेसबुक पुरते सुख शोधत आहेत. सुरुवातीला कॉलेजची गर्दी कमी झाली, मग जुनियर कॉलेजमधील विद्यार्थी कोचिंग क्लासेस मध्ये दिसू लागले. पुढे दहावीपर्यंतचे विद्यार्थी दुपारी चार वाजता शाळेतून निघून जाऊन ट्युशन क्लास करू लागले आणि आज अगदी प्राथमिक शाळेतील विद्यार्थी शाळेमध्ये शून्य उपस्थिती असून ट्युशन क्लास मध्ये आपला वेळ घालवत आहेत. अगदी समांतर शिक्षण संस्था सुरू झाल्या आहेत. शिक्षक आपल्याला काम कमी झाले म्हणून समाधान मानत आहेत मात्र भविष्यात आपण शिक्षक नावाची पिढी नष्ट करण्याकडे वाटचाल करत आहोत याचे कोणालाही भान नाही. एस टी महामंडळचा संप झाला त्या संपाला जनाधार शून्य होता. ज्याची लढाई त्याला लढावी लागेल मला त्याचे काय? असे विचार करणारे नागरिक विविध सोयी सवलती भेटतात म्हणून एस टी महामंडळ समोर प्रवासासाठी रांगात लावताना दिसू लागले. महिलांना अर्धे तिकीट मिळते म्हणून घरातील कर्ते पुरुषही एस टी ने प्रवास करू लागले. 75 वर्ष वयाच्या लोकांना मुक्त प्रवास सुरू झाल्यावर 75 वर्षे वयाचा सासरा अमरावती वरून मटणाचा डबा जावयासाठी नागपूरला नेऊन देतो असा एक किस्सा माझ्या वाचनात आला. यावरून आपला देश कशासाठी सोयी देतो आणि आपण त्याचा वापर कशासाठी करतो? याचा विचार करण्याची वेळ आली आहे असं कुणालाही वाटले नाही, फक्त सर्वांनी तो किस्सा एन्जॉय केला. 2022 मध्ये माननीय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेला मोठे खिंडार पडले तर 2023 मध्ये अजित दादा शरद पवारांना सोडून सत्तेत सामील झालेच. राजकारण या विषयावर मला फारसे कळत नसल्याने मी राजकारणावर बोलणे उचित नाही मात्र तरीही सत्तेसाठी कोणत्याही तडजोडी करण्यासाठी वर्तमान काळ सज्ज झाला आहे असे चित्र उभे राहून निष्ठा आणि सामंजस्याचे राजकारण यापुढे दुरापास्त होईल असे वाटू लागले आहे. अर्थात राजकारण्यांनी असे वागून सर्वसामान्यांना कोणतीही पक्षनिष्ठा आणि व्यक्तीनिष्ठा महत्त्वाची नसून वेळेनुसार निर्णय घ्यावे लागतात त्यामुळे तुम्ही आपसात भांडत राहू नका असा अप्रत्यक्षपणे सल्ला दिला आहे मात्र तो सल्ला सामान्य जनता कितपत समजून घेते? ते सांगणे कठीण आहे. कोणतीही विशेष नैसर्गिक आपत्ती या वर्षभरात आलेली दिसत नसली तरी माणसा माणसात वाढलेला दुरावा ही एक फार मोठी हानी आहे असे मला वाटते. फॅक्चर फ्रीडम सारख्या पुस्तकाला राज्य पुरस्कार मिळाल्यावर जो फायदा झाला असता त्यापेक्षा जास्त फायदा शासनाने त्या पुस्तकाचा पुरस्कार वापस घेतल्यामुळे झाला असे मला वाटते. कृष्णात खोत यांच्या रिंगाण या कादंबरीला मिळणारा सहित्य अकादमीचा पुरस्कार एका योग्य साहित्य कृतीला मिळाला असला तरी साहित्य अकादमीच परिक्षेत्र दुःख दारिद्र्य दैन्य या चष्म्यातून साहित्याकडे पाहणे आणि पुरस्कृत करणे या पलीकडे गेलेल दिसत नाही. साधारण साहित्य अकादमी प्राप्त पुस्तकांच्या यादीवर नजर फिरवली तर मध्यम वर्गाला कोणतेही दुःख नसते किंवा मध्यम वर्गाचे दुःख महत्त्वाचे नसते असा निष्कर्ष काढणे सोपे आहे. त्याविषयी या ठिकाणी फार जास्त बोलणे उचित राहणार नाही. साहित्य क्षेत्रात एकंदर यावर्षी निर्माण होणारी साहित्य संपदा भरीव तसेच मोठ्या प्रमाणात असली तरी आशयाच्या बाबतीत अनेक साहित्यकृती निराश करतात हे सांगावे लागेल. चित्रपट क्षेत्रात देशभक्तीचा नारा लावून गदर 2 गर्दी ओढू शकतो ही बाब सकारात्मक वाटली तरी ॲनिमल सारख्या चित्रपटात अंतरंग वस्त्रावरील संवाद, प्रचंड मोठ्या प्रमाणातील रक्तपात लोकांना का आवडत असतील? असा प्रश्न उपस्थित होतोच की माणसाची मूळ वृत्ती अशीच आहे. आणि त्यांना स्वतःला तसे वागता येत नाही म्हणून तो चित्रपटातील नायका सोबत तादात्म होऊन स्वतःला त्यात शोधत आहे? असा प्रश्न निर्माण होतो. मराठीमध्ये बाई पण भारी, नाळ 2, वाळवी, झिम्मा 2 अशी संवेदनशील मनोरंजकता सकारात्मक ठरली याबद्दल शंका नाही. क्रीडा क्षेत्रामध्ये कोणताही (वन डे चा असो की ट्वेंटी-ट्वेंटी) क्रिकेट वर्ल्ड कप म्हणजे एक उत्सव असतो. तर तसा वर्ल्ड कप 2023 मध्ये झाला , विराट कोहली, रोहित शर्मा, मोहम्मद शमी अशा भारतीय खेळाडूंनी स्पर्धा गाजवली खरी, पण ती जिंकता आली नाही. सलग 10 वेळा जिंकून अकरावी मॅच हरल्यावर तमाम भारतीय नाराज झाले हे खरे पण लगेच 2024 मध्ये येणाऱ्या वर्ल्ड कप ची वाट आपण पाहायला लागले. तर खरी गंमत हीच आहे. अनेक नैराश्याच्या गर्तेतून जात असलो तरी उद्याचा येणारा दिवस आपला आहे. त्या दिवसावर आपल्या विजयाचा शिक्का असेल, येणाऱ्या दिवसाच्या झोळीत आपल्यासाठी सुख असेल. . म्हणजे 2023 मध्ये मागील दोन-तीन वर्षापेक्षा पाऊस कमी पडला, सोयाबीन कमी झाले पण 2024 मध्ये भरपूर पाऊस पडेल आणि चांगले पीक येईल हा आशावाद माझा शेतकरी राजा मनामध्ये ठेवणारच, बेरोजगार युवकांना स्वतःची किती चिंता आहे? ते मला माहित नाही पण आपल्या बेरोजगार मुलांना रोजगार मिळावा हा आशावाद प्रत्येक पालकाच्या मनामध्ये असेल असे मला वाटते. ग्रामपंचायत मध्येही ज्याचा उमेदवार निवडून येत नाही त्या राजकारणी गटाला आहे महाराष्ट्राचा मुख्यमंत्री आपला असेल हा दुर्दम्य आशावाद निवडणुकीच्या अगोदर असतोच त्यामुळे 2024 च्या लोकसभेच्या आणि महाराष्ट्राच्या विधानसभेच्या दोन्ही निवडणुका आपल्याला आमदार किंवा खासदार करणार अशा भ्रमात असणाऱ्या अनेक राजकारण्यांच्या मनाच्या आशावादाचे काय सांगावे? चंद्रयान 2 चे यशस्वीपणे होणारे लँडिंग आणि त्यातून येणारे फोटोग्राफ जितके आकर्षक असतात ना तेवढेच आकर्षक असते जीवन.... कधी पंजाबराव डख ह्यांनी सांगूनही पावसाने वेळ चुकविल्या सारखे फसवे, कधी कोहलीच्या 50 व्या वन डे शातकासारखे दिलासादायक तर कधी रोहितच्या षटकाराची नोंद होण्या आधी सीमारेषेवर झेलबाद होण्याइतकं वाईट, कधी येणाऱ्या 22 जानेवारीला अयोध्येतील राम मंदिर सुरू होण्याच्या जल्लोषा सारख तर कधी आय पी एल मध्ये मिचेल स्टार्क ला एक चेंडू फेकण्यासाठी 10 लाख रुपये मोजणाऱ्या श्रीमंत व्यापाऱ्यांनी देशातील ग्राहकांना एखादे प्रोडक्ट 100 रु नी स्वस्त का देऊ नये? असा विचार करायला लावत ते असतं जीवन, मेंढ्यांच्या कळपासारखं सतत कुणाचं तरी अनुकरण करणारं आणि सश्याच काळीज असतांनाही सिंहाच्या फसव्या तोऱ्यात मिरवणार होय ना..?? तर अस हे जीवन आणि काळ कधीच बदलत नसतो हे सांगताना मला असे म्हणावे वाटते की, काळ बदलता येत नाही

**काळ बदलता येत नाही भिंतीवरच्या कॅलेंडरप्रमाणे ...
अव्यक्तपणाच्या पोकळीत साठवून राहिलाय घनगर्द
मिट्ट काळोख स्वप्नांच्या राखेचे कण
देतात खूप काही जळून गेल्याची जाणीव ठसठशीतपणे...
काळ बदलण्याची चाहूल सैरभैर करते
शब्द न सापडलेल्या बैचन कवितेच्या
पात्रा सारखी चेहरा कायम हरवलेला असतो
शब्दाच्या वळणावरचा याच वळणावर सताड उघड्या
डोळ्यांनी शोधाव्या लागतात सावल्या
आपण ज्यांचा बोट धरून चाललो त्यांच्या
आणि ज्यांना आपण चालायला शिकवलं त्यांच्याही
सतत छळणाऱ्या काळाच्या भासमान अभासात सर्व
सावल्या झालेल्या असतात लुप्त आजवर कोणीच पकडू
शकले नाही**

# सामाजिक शिक्षिका- सावित्रीमाई फुले



रोशनी भाऊराव देबाजे
मेहकर, बुलढाणा

आधुनिक केसरी

**सावित्रीमाई फुले यांचे कार्य व विचार येथील व्यवस्थेने मर्यादित करून ते समाजा पर्यंत पोहचुच दिले नाही. सावित्रीमाई फुले यांनी मुलींची पहिली शाळा सुरू करून महिलांना फक्त सुशिक्षित केले नाही तर सावित्रीमाई फुले या सामाजिक शिक्षीका होत्या. त्यांनी संपूर्ण मानव समाजाला सामाजिक शिक्षण देऊन सामाजिक क्रांती केली हे विसरून जमणार नाही. मुलींसाठी शिक्षण सुरू करणे हे जेवढे क्रांतीचे व काम होते तसेच अनेक काम ज्याला धर्मांने आणि शास्त्रांनी मान्यता दिली नव्हती अशा संवेदनशील चालीरीती सावित्रीमाई फुले यांनी हानुन पाडल्या.**

धर्म आणि शास्त्राच्या नावाखाली महिलांचे मानसिक, शारीरिक शोषण होऊन महिलांना केवळ हीन वागणूक मिळत होती. महिलांचे जगणे असह्य व वेदनेने भरलेले होते. तत्कालीन धर्म आणि शास्त्र महिलांना मानव मानायला तयार नव्हत्या. धर्मग्रंथ, संस्कृती, रुढी पंरपरा याच्या गुलामी मध्ये स्त्री जगतच होती वरुन पुरुषांचीही गुलामी तिच्या वर होतीच. म्हणजे महिलांचे सामाजिक स्थान काय होते याची कल्पना न केलेली च बरे. सावित्रीमाई च्या विचाराचा व कार्याचा विचार केला तर त्यांचे श्रेष्ठत्व आपल्या लक्षात येते. आज लोकांची जेवढी कमाई नाही तेवढा कर त्यावेळी फुले कुटुंब ब्रिटिश सरकारला देत होते. म्हणजे फुले कुटुंब काही गरीब नव्हते. आजच्या भाषेत बोलायचे झाल्यास श्रीमंती असल्यावर अडचणी दुर होतात असे बोलले जाते. मग सावित्रीमाई चे पती अर्थात महात्मा जोतिबा फुले हे गजगंड श्रीमंत असताना. फुले दाम्पत्याच्या वाट्याला दुःख का आणि कोणामुळे आले याचा विचार केला तर मन सुन्न होते. समाजासाठी गजगंड श्रीमंती सोडून गरिबीचे जिवन जगणे पसंत केलेल्या माऊलीचे काळीज केवढे असेल? इतरांना जागृत करण्यासाठी स्वतः च्या सुखाचा, श्रीमंतीचा, घराचा त्याग करून इतरांना सुख देण्यासाठी मनाची तयारी करणे हे साध्या व्यक्तीचे काम नाही. एक साधा विचार करा आजही पोटाला पोटभर मिळत असेल तर घरातील बाई गल्लीतील सांडपाण्या बद्दल माणसाला बोलु देत नाही. आपल्याला काय करायचे त्यांचे ते बघुन घेतील आपल्याला त्यांच्या मध्ये पडायचे नाही असे नवऱ्याला सांगते. अशी आजची माणसिकता असताना दिडशे वर्षा अगोदर सावित्रीमाई फुले यांनी जोतीरावांना कसे सहकार्य करून कसे जोतीरावां सोबत उभी राहली असेल? महिलांसाठी, समाजातील चुकिच्या रुढी परंपरा, मानसिक गुलामगिरी विरोधात आवाज उठवला नसता तर पैशाच्या ठिगात आणि फुलांच्या सुंगधात सावित्रीमाई राहली असती. मग उपाशी राहुन अंगावर शेणमाती का घेतली असेल याचा विचार कधी करायचा? सावित्रीमाई च्या या विचारातून सामाजिक प्रेरणा घेऊन आज आपण काही धडा घेणार आहोत का? सावित्रीमाई फुले ह्या शिक्षीकेसोबतच त्या इतिहासाच्या अभ्यासक होत्या, कवयित्री होत्या. सावित्रीमाई च्या काव्यामधुन बहुजन महापुरुषांचा, संताचा जयजयकार दिसुन येतो. सावित्रीमाई च्या काव्यातून मनुस्मृती सारख्या विषारी पुस्तकावर आसुड ओढून समतेची शिकवण प्रस्थापित केली आहे. अनिष्ट रुढी परंपरा याच्या विरोधात कणखर भुमिका घेऊन दैववाद व अंधविश्वास झुगारून विज्ञानवादाची शिकवण देणाऱ्या सावित्रीमाई होत्या. समाजाच्या चुकिच्या संस्कृती मुळे विधवा महिलांना कुमारवयीन मातांना अत्यंत हलाखिचे जिवन जगावे लागत होते. देवदासी सारख्या माणुसकी ला काळीमा फासणाऱ्या प्रथा येथे सुरू होत्या. त्यांना आळा घालुन समाजावर मानवतावादी संस्कार घालण्याचे काम केले. केशोपन सारख्या प्रथा बंद करून



महिलांना सामाजिक सन्मान मिळवून देण्यासाठी महात्मा फुले सोबत उभ्या राहून नाव्ह्यांचा संप घडवून आणुन एक वेगळी क्रांती केली. विधवा मातांना सन्मान व सुरक्षित बाळंतपण होण्यासाठी स्वतः च्या घरी प्रसुती गृह तयार करून त्याची रितसर जाहिरात केली आणि आपल्या पतीच्या कार्याला मनोभावे सहकार्य केले. अनेक विधवांना आधार देऊन त्यांच्या जीवनात आनंद आणि सुख निर्माण करण्याचे काम सावित्रीमाई फुले यांनी केले. विधवा स्त्रियांचा उपभोग घेणाऱ्यांना काही समाजात कोणतीही शिक्षा नव्हती परंतु पशुप्रमाने अत्याचार करून विधवा गर्भवती राहली तर तिच्या दुःखत वेदना देण्यात धन्यता मानणारी संस्कृती सावित्रीमाई फुले यांनी हानुन पाडली. सर्वजन एकाच वंशाचे आहेत म्हणून भेदाभेद हानुन पाडला पाहिजे. भेदभाव हानुन पाडण्यासाठी आणि आणि विधवांना सन्मान मिळण्यासाठी आंतरजातीय विवाह व विधवा पुर्नविवाह सारखे क्रांतीकारी पाऊल सावित्रीमाई फुले यांनी उचलले. विधवा महिलेची प्रसुती करून त्यालाच दत्तक घेऊन योग्य शिक्षण व संस्कार घालुन समाजाचा डॉक्टर तयार केला. डॉक्टर हा सेवेसाठी असतो. सेवेच्या नावाखाली मेवा खाण्यासाठी नाही. हि शिकवण स्वतः च्या मुलाला देऊन गरजु लोकांची सेवा करण्याचे संस्कार घातले. प्लेग सारख्या महामारी मध्ये यशवंत अर्थात सावित्रीमाई फुले यांच्या मुलाने रुग्णांची सेवा केली. प्लेग ही संसर्गजन्य महामारी आहे हे माहित असुन ही रुग्णांना स्वतः च्या खांद्यावर उचलून दवाखान्यात नेण्याचे मर्दानी काम सावित्रीमाई फुले यांनी केले. सावित्रीमाई चे कार्य व विचार बघितले तर आजही सामाजिक संस्कार घालून आजही सामाजिक शिकवण देण्याचे काम करत आहेत. परंतु अंधविश्वास, पाखंड यामधुन सावित्रीमाई फुले यांनी समाजाला बाहेर काढण्याचा प्रयत्न केला पण आजही सावित्रीमाई च्या कार्याची व विचाराची जाण नसल्यामुळे लोक वैचारिक दृष्टीने मागास आहेत. वैचारिक दृष्टीने परिपक्व होण्यासाठी आणि सामाजिक जडणघडण करण्यासाठी सावित्रीमाई चे विचार आजही प्रेरणा देतात. म्हणून सावित्रीमाई फुले खऱ्या अर्थाने सामाजिक शिक्षीका ठरतात. अशा या महान शिक्षीका आणि करोडोंची असलेल्या माईची आज जयंती. जयंतीच्या सर्वांना मंगलमय सदिच्छा..

# आद्य क्रांतिकारी शिक्षिका सावित्रीबाई फुले!



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**माती आणि माता नसती तर काय झाले असते? काहीच उगवले आणि कुणीच जन्मले नसते. माय-मातीच्या जीवघेण्या त्यागावर संपूर्ण विश्वाचा डोलारा उभा आहे. या दोघींचं रुजवणं आणि उगवणं अविरतपणे सुरु आहे, ही आपल्यासाठी मोलाची बाब! जगाच्या आरंभापासून ते अंतापर्यंत जिच्यामुळे सर्वकाही घडून येत असतांना तिच्या नशिबी मात्र नित्य उपेक्षाच! तुम्हाला मला जन्म देणाऱ्या मायनं शेतीचा शोध लावला, सर्वच पुरुषांना शिकवणारी ती आद्य शिक्षिका! स्त्री शक्तींचा इतिहास मोठा देदीप्यमान आहे! आत्तापर्यंत अनेक महान मातांनी आपल्या जीवाचं बलिदान देऊन इथली क्रांतीची मशाल अखंड तेवती ठेवली आहे. याच महान धुरंधर स्त्रियांच्या तजोमय रांगेत सदैव अग्रस्थानी उच्चारले जाणारे नाव म्हणजे आद्य स्त्री शिक्षीका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले! इतिहासातील महान मातांच्या नावांचा उल्लेख झाला की; अंगावर शहारे येतात.**

आपल्या पोटच्या गोळ्यासाठी स्वतःच्या जीवाची बाजी लावणाऱ्या, अश्यक्य असा गड सर करणाऱ्या हिरकणी या महान मातेची कहाणी जशी मोठ्या सन्मानाने सांगितली जाते तशीच इथला सामान्य माणूस जगला-स्वावलंबी-आत्मभान असणारा झाला पाहिजे यासाठी अहोरात्र झगडून आपले साम्राज्य उभारणाऱ्या राजमाता, राष्ट्रमाता जिजाऊ आईसाहेब, रणरागिणी माता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या आणि अन्य शक्तिशाली स्त्रियांचा गौरव नित्य झाला आहे आणि अचंद्रसूर्य होत राहिल!



सावित्रीबाई फुले यांचा इतिहास आणि कार्य केवळ एका लेखात लिहून बंदिस्त होणारे नाही. त्यांचा जीवनपट अनंत आव्हाने आणि खडतर वळणांनी भरलेला आहे. या महामानवांची चरित्रे आणि चारित्र्य नीट तपासून पहिले असता, आपण काय करत आहोत? आपल्या भोवताल आणि एकूणच देशाच्या उभारणीत आज आपले योगदान काय? या प्रश्नांची उत्तरे शोधतांना आपले आपल्यालाच हसू आल्याशिवाय राहणार नाही. केवळ नऊ वर्षे वयाच्या सावित्रीबाई तेरा वर्षाच्या ज्योतीराव फुल्यांबरोबर सून म्हणून घरात आल्या. सावित्रीबाईंच्या वडिलांच्या घरी पाटीलकी होती. नेवसे गावचे पाटील असलेले वडील श्री विठ्ठलराव यांनी आपल्या लेकीवर शिक्षणाचे संस्कार रुजवले होते. माहेरावरून येतांना सावित्रीबाई ख्रिश्चन मिशनरींनी दिलेले एक पुस्तक सासरला घेऊन आल्या. अगोदरच वेगळे काहीतरी करण्याचे वेड असलेले त्यांचे पती ज्योतीराव फुले ते पुस्तक वाचून आणखीनच बदलले. त्या काळात सर्वत्र क्रांतिकारी विचारांचे वारे जोरात वहात होते. एकोणिसावे शतक म्हणजे जगभर सुरु असलेल्या स्वातंत्र्य, समता, बंधुता संबंधाने सुरु असलेल्या चळवळी! दुसरीकडे भारतात धर्माचा समाजमनावर खोलवर प्रभाव झाला होता! कट्टर वर्णव्यवस्था, जातीभेद यांनी भारताचा तळ गढूळ झाला होता. समाजव्यवस्थेच्या अनंत चिरकाळ्या झाल्या होत्या. खऱ्या धर्माला ग्लानी आली होती. अनेक शतकापासून चालत आलेला वारकरी संप्रदाय केवळ मंदिरात बंदिस्त झाला होता. "यारे यारे लहान थोर" हा वारकरी विचार मावळला होता. ज्ञानोबा-तुकोबांचे अभंग ऐकू येत नव्हते. सगळीकडे भोंदू-बाबांचा सुळसुळाट झाला होता. असे असतांना युवा ज्योतीराव फुले काहीतरी वेगळे करण्याचा विचारात असायचे. सत्यनारायणाची कथा मोठ्या भावभक्तीने ऐकणारा समाज आपल्या घरातील बालविधवा सूनेला सती पाठवायला अथवा तिचे केशवपन करून तिला बंदिस्त कोठडीत टाकायला मागेपुढे पहात नव्हता. आपल्या भोवतालची प्रचंड विषारी विषमता, गरिबी, दारिद्र्य, उपासमार, स्त्रियांचा प्रचंड छळ इत्यादी पाहून ज्योतीराव मनोमन व्यथित व्हायचे! नवविवाहित असतांना प्रेमाच्या गप्पात मशगुल न होता रात्र रात्र याचाच अखंड विचार करत राहायचे. यासाठी आपण काहीतरी केलं पाहिजे? हा सवाल त्यांना स्वस्थ बसू देत नव्हता. असे विचारांचे वादळ सुरु असतांना सावित्रीबाई पंधरा सोळा वर्षाच्या झाल्या. भोवताल अनेक बाल विधवा, केशवपन केलेल्या, घरात बंदिस्त असणाऱ्या युवा भगिनी पाहून यांच्यासाठी काहीतरी करायला हवे. यांना लिहायला, वाचायला शिकवायला पाहिजे असे ज्योतीरावांना मनोमन वाटायचे, मात्र यांना शिकवायला स्त्री शिक्षिका कुठून आणायची? हा फार मोठा यक्ष प्रश्न त्यांच्या समोर उभा राहिला आणि हा प्रश्न आपल्या घरातूनच सोडवायचे त्यांनी ठरवले. आपली पत्नी सावित्रीबाईंना लिहायला-वाचायला आणि शिकवायला शिकवायचे असे ज्योतीरावांनी ठरवले. हे फार मोठे क्रांतिकारी पाउल होते! चूल आणि मूल विचारसरणीत अडकलेला बुरसटलेला समाज हे स्वीकारेल का? याचा तिळभर विचार न करता ज्योतिबा कामाला लागले आणि त्यांच्या युवा पत्नी सावित्रिबाईंनी त्यांना खंबीर साथ द्यायचे ठरवले! त्यानंतरचा त्या दोघांचा संपूर्ण जीवनपट मोठा क्रांतिकारी ठरला.

ज्योतीराव-सावित्रीबाई यांनी १८४८ साली मुलींची पहिली शाळा पुण्यात काढून आपल्या क्रांतीचे रणसिंग फुंकले. अगोदर आपल्या घरातील पाण्याची विहीर सर्व समाजासाठी खुली करून क्रांतिकारी कार्याला ते सामोरे गेलेच होते. मुलींच्या शाळेत जातांना सावित्रीबाईंना कुजलेल्या समाजाने अतोनात छळले. शिव्यांची लाखोली, त्यानंतर शेण, चिखल, सडकी अंडी आणि एवढ्यावरही काम थांबले नाही तेंव्हा चांडाळानी सावित्रीबाईंना अक्षरशः दगड मारले. त्यात सावित्रीबाई रक्तबंबाळ झाल्या. एवढे होऊनही त्यांनी आपले काम थांबवले नाही. अविरतपणे आपले काम करतांना प्रचंड त्रास सहन करावा लागला. अंगावरील एका लुगड्याचे दोन तुकडे करून एक अंगावर शेण-चिखल-सडकी अंडी झेलण्यासाठी आणि दुसरे शाळेत गेल्यावर शिकवण्यासाठी वापरले!

शिक्षणाचे काम सुरू असतांना ज्योतीरावाकडून लेखनाचे बाळकडू घेतले आणि एकही दिवस शाळेत न गेलेल्या सावित्रीबाई लेखिका, कवयित्री झाल्या. काव्यफुले (काव्य संग्रह), सुबोध रत्नाकर, सावित्रीबाईंची गाणी, बावनकशी इत्यादी चार महत्वपूर्ण ग्रंथ उपलब्ध आहेत. शाळेशिवाय ज्ञान नाही विद्या नाही, ते घेण्याची गोडी नाही बुद्धी असुनी चालत नाही, तयास मानव म्हणावे का? असे रोखठोक काव्य लिहून समाजाची कानउघाडणी करणाऱ्या सावित्रीबाई फुले ह्या केवळ वर्गातीलच नाही तर समाजातील लोकशिक्षक झाल्या. या शिवाय त्यांचे विचार फारच प्रगल्भ आणि दिशादर्शक होते. ज्योतीरावांचे निधन झाल्यानंतर दत्तक पुत्राला प्रेताग्नी देण्यास विरोध झाल्यानंतर सर्व रीतीरिवाज झुगारून स्वतः आपल्या पतीच्या सरणाला प्रेताग्नी देण्याचे क्रांतिकारी पाऊल त्यांनी उचलले. असे असतांना पुण्यात भयंकर प्लेगची साथ आली. स्वतःला झोकून देऊन प्लेगग्रस्त लोकांना दवाखान्यात नेण्याचे काम केले. यातच प्लेगची लागण होऊन वयाच्या ६६ व्या वर्षी त्यांचे निधन झाले. एका क्रांतिकारी, कृशील, समाज ऋण फेडणाऱ्या महान मातेचा अंत झाला.

बंधू-भगिनींनो, आज आपण स्वातंत्र्याच्या शंभरीकडे जातांना काय करत आहोत? आज चळवळी कुठं आहेत? आज शिकेलेली मंडळी काय करत आहे? उच्च शिक्षित स्त्रिया काय वाचत, लिहित, बोलत आहेत? असे एक ना अनेक प्रश्न आपल्यासमोर उभे आहेत. तासनतास मोबाईलच्या निर्जीव काचावर बोटं चाळवून थकलेला तरुण वर्ग काय चिंतन करतोय? आयोगावर आयोग घेऊन शिक्षणाची अवस्था काय झाली आहे? असे अनंत प्रश्न आज महान कवयित्री सावित्रीबाई फुले यांच्या जयंती दिनी मला सतावत आहेत. मी माझे थेंबे थेंबे काम करतो आहे, आपणही फूल नाही फुलाची पाकळी या नात्याने प्रबोधन, समाज ऋण फेडण्याचे कार्य करावे हीच माफक अपेक्षा! जय क्रांतीज्योती सावित्रीबाई!



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

# सावित्रीमाईची महती, समजून कधी घेती ?

आधुनिक केसरी

**सावित्रीमाई फुले ह्या महिलांसाठी क्रांती करून महिलांना मान सन्मान मिळवून देणाऱ्या महिलांच्या उद्धारक आहेतच. परंतु सामाजिक विषमता, अनिष्ट रुढी परंपरा आणि भटशाहीची गुलामी झुगारून सामाजिक क्रांतीच्या थोर क्रांतिकारक ही त्याच आहेत. सावित्रीमाई फुले यांच्या मुळे महिला शिकायला लागल्या. सावित्रीमाई फुले यांनी मुलींची पहिली शाळा सुरू करून महिलांना शिक्षण सुरू केले. हे आज सहज वाटत असेल पण जेव्हा सावित्रीमाई व ज्योतीबा फुले यांनी मुलींसाठी शाळा सुरू केली तेव्हा ही खुप मोठी क्रांती होती.**

कारण मुलींनी महिलांनी शिक्षण घेणे म्हणजे धर्म बुडवण्याचे काम होय. मुली शिकल्या म्हणजे चंचल बनुन कुटुंब व्यवस्था नष्ट होईल. मुली शिकल्या म्हणजे जे अक्षर काढतील त्या अक्षराच्या आळ्या होऊन जेवनाच्या ताटात येतील, मुली शिकल्या म्हणजे त्यांचे नवरे लवकर मरतात अशा अफवा पसरवुन महिलांना कायम गुलामगिरी मध्ये ठेवण्याचे काम विकृत मानसिकतेच्या लोकांनी केले होते. शिक्षणाच्या मागचा उद्देश हा महिलांना केवळ अक्षर ओळख करून देणे एवढाच नव्हता तर स्त्रियांनी अंधविश्वास, पाखंड, भोंदुगीरी, अनिष्ट रुढी परंपरा यामधून बाहेर पडून एक मानव म्हणून आदर्श जिवन जगावे या साठी शिक्षणाच्या माध्यमातून जागृती करण्यासाठी सावित्रीमाई फुले यांनी अंगावर शेणमाती घेऊन मुलींना शिक्षण दिले. मुली महिला शिकल्या पण पण शिक्षणातून जागृत कीती महीला झाल्या? शिकलेल्या महिलांना सावित्रीमाई किती कळाल्या हा संशोधनाचा विषय आहे. कारण हजारो वर्षांपासून देवा धर्माच्या व विषमतेच्या आधारावर मानसिक गुलामी लादुन सर्व सामान्य लोकांना लुबाडून झोळी भरण्याची परंपरा आजही सुरूच आहे. स्वरूप थोडेफार बदलले असेल मात्र वृत्ती तिच आहे. सावित्रीमाई फुले आजही महिला अज्ञान, अंधविश्वास, पाखंड, भोंदुगीरी, फसवणूक होण्याच्या ठिकाणी गर्दी करतात. परंतु महिलांच्या उद्धारासाठी शेणमाती अंगावर घेऊन, कपटी लोकांचा विरोध सहन करून महिलांना सोन्यापेक्षा मौल्यवान जिवन व शिक्षण बहाल करणाऱ्या सावित्रीमाई बद्दल आजही महिला अज्ञानी असतील तर त्या शिक्षणाचा आणि वैभवाचा काय फायदा? आपल्या कडे नैतिकता आणि प्रामाणिक पणा असेल तर आपल्याला साठी ज्याने थोडेफार काही केले तर त्याची जाणीव ठेवणे याला संस्कार म्हणतात. मग सावित्रीमाई फुले यांनी शिक्षणासाठी दुःख सहन करून महिलांना सर्वोच्च सुख दिले याची जाणीव महिलांना का नसेल? सकाळी उठल्यावर महिलांच्या उद्धारक असलेल्या सावित्रीमाई समोर किती महिला नतमस्तक होत असतील? नतमस्तक होणे सोडून द्या किती शिकलेल्या महिलेच्या घरात सावित्रीमाई फुले यांचा फोटो असेल? जो अंधविश्वास, पाखंड, भोंदुगीरी सावित्रीमाई फुले यांनी झुगारून लावले त्या अंधविश्वास, पाखंडाला पवित्र समजून नित्यनेमाने त्याची अंमलबजावणी करणाऱ्या महिला खरचं सावित्रीमाई च्या लेकी होऊ शकतात का? शिक्षणाने माणूस जागृत होतो सत्य असत्यामधला फरक करतो. परंतु आज शिकलेल्या लोकांना, महिलांना आपल्या उद्धारकर्त्यांबद्दल सहानुभूती, आपुलकी व आदर नसेल तर यांना शिक्षण म्हणावे का? असा प्रश्न उभा राहतो.

**शुद्रांना सांगण्याजोगा। आहे शिक्षण मार्ग हा**
**शिक्षणाने मनुष्यत्व। पशुत्व हटते पहा इंग्रजी शिकुणी।**
**जातीभेद मोडा भटजी भारूडा। फेकुनिया**

वरील काव्याचा विचार केला तर माणसाला शिक्षीत होऊन जातीभेद नष्ट करायचा असेल तर भटजीचे भारुड फेकुन द्यावे हाच उपाय सावित्रीमाई फुले यांनी सांगितला आहे. परंतू चुकिच्या आणि कुचकामी बाबींचा संबंध धर्माशी जोडून चुकिच्या व कुचकामी गोष्टींवर बोलले तर लोकांच्या भावना दुखतात आणि चांगल्या व प्रगतीच्या सर्वसमावेशक आणि विज्ञाननिष्ठ गोष्टी आजही धर्मांशी जोडल्या जात नाहीत. यालाच मानसिक गुलामी म्हणतात आणि हिच गुलामी कायम रहावी म्हणुन महिलांना शिक्षण, हक्क अधिकार नाकारले होते. आजही गुलामी मोठ्या प्रमाणात असल्याने महिलांना व लोकांना सावित्रीमाई फुले या धर्मविरोधी वाटतात. म्हणून च तर अंगावर शेणमाती घेऊन, स्वतः च्या सुखावर पाणी फिरवून स्त्रियांच्या उद्धारासाठी झटणाऱ्या सावित्रीमाई फुले अजूनही महिलांच्या घरात आल्या नाही ही खूप मोठी शोकांतिका आहे.

**गोट्याला शेंदुर। फासुन तेलात बसवी देवात। दगड तो**
**धोंडे मुले देती। नवसा पावतीलग्न का करती। नारी नर**

वरील सावित्रीमाई चे विचार आजही लोकांना धर्माच्या विरोधात वाटतील. आज विज्ञानाची प्रगती झाली तरीही अनेक महिला पुरुष अज्ञान युगात वावरत आहेत. मानवतेपेक्षा, माणुसकी पेक्षा दगडाला जास्त किंमत दिली जाते, अनेक स्वतः ला सुशिक्षित समजणारे जोडपे सुख समाधानासाठी, पुत्रप्राप्ती साठी आजही अनेक प्रकारचे नवस करतात. ह्या गोष्टी शिक्षणाला व विज्ञानाला काळीमा फासणाऱ्या आहेत परंतु अधोगतीकडे घेऊन जाणाऱ्या आहेत. याची जाणीव सावित्रीमाई फुले यांनी दिडशे वर्षाअगोदर करून दिली. पण काय आजही आम्हाला ते कळाले का? सावित्रीमाई फुले यांनी शिक्षणाच्या माध्यमातून जागृती व जागृती च्या माध्यमातून प्रगती यासाठी आपले आयुष्य खर्ची घातले. जर शिक्षण हे प्रगती साठी असेल. आणि तेच नाकारले असेल तर याचा अर्थ एकंदरीत महिलांची सर्व प्रगतीच नाकारली गेली होती हे सत्य आहे. मग महिलांसाठी सावित्रीमाई फुले व महात्मा ज्योतिबा फुले यांनी शिक्षण सुरू करून अडीअडचणींना सामोरे जाऊन महिलांना प्रगतीचे द्वार खुले करून दिले. पण ते बंद कोणी आणि का केले यावर महिला कधी बोलणार? महिलांना शिक्षण, हक्क अधिकार नाकारून मानसिक गुलाम बनवणारे किती निच मानसिकतेचे असतील याची प्रचिती येते. या निच माणसिकतेचा विरोध महिला करणार का? की सावित्रीमाई फुले यांच्या कार्याला व विचारांना पायदळी तुडवून निच रुढी परंपरा विषमतावादी व अंधविश्वास पसरवणाऱ्या गोष्टीच स्विकारून आपली गुलामी कायम ठेवतील?

**नांगर धरती। शेती जे करती मठ्ठ ते असती। मनु म्हणे**
**करू नका शेती। सांगे मनुस्मृती धर्माज्ञा करीती। ब्राम्हणास**

सावित्रीमाई फुले यांना महात्मा जोतिबा फुले यांनी शिक्षीत केल्याने आपला शत्रु निर्धारित करता आला, चुकिच्या गोष्टी कोणत्या चांगल्या गोष्टी कोणत्या यामधील फरक करता आला. जेव्हा स्त्रियांना अनेक सामाजिक बंधने होती तेव्हा सावित्रीमाई फुले यांनी बंधने तोडून मानसिक स्वातंत्र्य मिळवणे म्हणजे क्रांतीच होती. मनुस्मृती नावाचे पुस्तक एवढे विषारी आणि किळसवाणे आहे की जो कोणी थोडाफार का होईना बुद्धीचा वापर करतो तो व्यक्ती मनुस्मृती नावाचे पुस्तक जाळल्या शिवाय राहणार नाही. शेती करणे हे हिन दर्जाचे काम आहे, शेती करणारे लोक मठ्ठ असतात असे मनुस्मृती सांगते. म्हणुन ब्राम्हणांनी शेती करू नये अशी आज्ञा मनुस्मृती ब्राम्हणाला देते. जी मनुस्मृती विषमता आणि गुलामी पेरते ती मनुस्मृती सावित्रीमाई फुले यांनी नाकारली परंतु त्याच मनुस्मृती नुसार आजही शिकलेल्या महिला स्वतःचे वर्तन करतात तेव्हा त्या शिक्षणाची किव येते.

**गुलामगिरीचे दुःख नाही जराही त्यास जाणवत नाही**
**माणुसकी ही समजत नाही तयास मानव म्हणावे का ?**

वरील काव्यामध्ये सावित्रीमाई फुले यांनी जी गुलामगिरी मांडली आहे त्याचा अर्थ व गांभीर्य आज सुशिक्षित लोकांना खरचं कळाले का? गुलामगिरी असुनही जर ती जानवत नसेल, गुलामगिरी चा विरोध होत नसेल, आणि माणुसकी ला जर किंमत नसेल तर त्यांना माणूस म्हणायचे का? बऱ्याच लोकांना माणुसकी याचा अर्थ आजही माहिती नाही. गोर गरिबांना मदत करणे याला माणुसकी म्हणत नाहीत तर गोरगरिबांना सोबत घेणे याला माणुसकी म्हणतात. थोडक्यात विषमता बाळगून मानुसकी दाखवता येत नाही तर समता प्रस्थापित करून माणुसकी जपता येते. हा या मागचा उद्देश आहे. सावित्रीमाई फुले यांचे विचार व कार्य आजही लोकांना दिशादर्शक असुन मानवाचा उद्धार करणारे आहेत. परंतु मुळ समस्या एकच आहे ती म्हणजे सावित्रीमाई फुले यांचे विचार समजून घेऊन त्याची अंमलबजावणी होत नाही. जर सावित्रीमाई फुले यांचे विचार समजून घेऊन प्रत्येकाने त्यांच्या शिकवणुकी प्रमाणे लागले तर प्रत्येकाचा उद्धार होऊन देशामध्ये समतेची, विचाराची, शिक्षणाची व विज्ञानाची क्रांती झाल्या शिवाय राहणार नाही. पण खंत एखच आहे आपले आयुष्य दुसऱ्या साठी खर्ची घालणारी सावित्रीमाई फुले आजही आजही अपवाद वगळता महिलांना कळाल्यांच नाही. सुशिक्षित महिला सावित्रीमाई समजून त्यांना वैचारिक वंदन करतील तोच खरा जागृतीचा दिवस होईल. सावित्रीमाई जयंती निमित्ताने त्यांचे विचार व कार्य जनमानसात पसरवुन त्यांना वैचारिक अभिवादन करणे हे प्रत्येक सुशिक्षित व्यक्तीचे कर्तव्य आहे. सावित्रीमाई फुले जयंती च्या समस्त भारतीयांना मंगलमय सदिच्छा..



गिरीश सुदाम बनकर
संपर्क क्र. ९०७५४६३०५३

# भारताच्या शिक्षण क्रांतीची मशाल फुले दांपत्य

आधुनिक केसरी

**महाराष्ट्र ही जशी साधू,संतांची भूमी तशीच ही महान क्रांतिकारी समाजसुधारकांचीहीं भूमीच या भारताला कित्तेक बुद्धिजीवी समाजपरिवर्तनवादी क्रांतिकारी विचारांचे स्त्री-पुरुष समाजसुधारक याच मातीने दिलेत या पैकीच एकोणीसाव्या शतकात समाज परिवर्तनाची नांदी आणणाऱ्या सत्याला धर्म मानून कर्मठ अराजकतेविरोधात आसुड उगारणाऱ्या फुले दांपत्याबद्दल जाणून घेणं आजच्या घडीला गरजेचं वाटतं. क्रांतिज्योती ज्ञानज्योती सावित्रीबाईंचा जन्म ३ जानेवारी १८३१ साली सातारा जिल्यातील नायगाव या गावी श्री.खंडोजी व सौ.लक्ष्मीबाई नेवसे पाटील या शेतकरी कुटूंबाच्या पोटी झाला. वयाच्या १० व्या वर्षी त्यांचा विवाह ज्योतीरावांशी झाला. त्यावेळी ज्योतीराव फुले हें १३ वर्षांचे होते. बालपणापासूनच जातीयतेचे चटके सोसत आलेल्या ज्योतिबांच्या मनात स्त्रियांना व अस्पृश्यांना शिक्षण देऊन व्यवस्थेच्या मुख्य प्रवाहात आणण्याची अगतिक तळमळ होती जी लग्नानंतर सावित्रीबाईंच्या माध्यमातून पूर्णत्वास नेण्याचे ठरवून त्यांनी सावित्रीबाईंना घरीच शिक्षण देऊन शिक्षित केले.**

व त्यानंतर अध्यापनाचे प्रशिक्षण सावित्रीबाईंनी अहमदनगर येथे फॅरारबाई व पुण्यातील मिचेलबाईंच्या नॉर्मल स्कुलमध्ये घेतले. ज्या काळात औषधलाही स्त्री स्वातंत्र्य शिल्लक नव्हते त्या काळात सावित्रीबाईंनी स्त्रियांना व अस्पृश्यांना शिकविण्यासाठी घराच्या उंबरठ्याबाहेर टाकलेले पहिले पाऊल हिचं आधुनिक भारतीय स्त्रीच्या सार्वजनिक जीवनाची सुरुवात आहे असं मानायला काहींच हरकत नाही. म्हणूनच सावित्रीबाईच या भारताच्या पहिल्या महिला शिक्षिका व मुख्याध्यापिका आहेत हें स्पष्ट होते.दि १ जानेवारी १८४८ रोजी पुण्यातील बुधवार पेठेतील भिडेवाड्यात महात्मा फुलेनीं भारतातील पहिली मुलींची शाळा सुरु केली आणि त्या शाळेतील विद्यार्थिनींच्या अध्यापनाची जबाबदारी पत्नी सावित्रीबाईंना दिली आणि खऱ्या अर्थाने इथेच सुरु झाली स्त्री मुक्ती ची क्रांतिकारी चळवळ.चूल आणि मूल एवढ्यापुरतं मर्यादित असणारं तत्कालीन स्त्रीजातीचं अस्तित्व आता शिक्षणाच्या प्रवाहात उजाळून निघणार होतं पुरुषांच्या खांद्याला खांदा खांदा देऊन महिला समाजात ताठ मानेने जगणार होत्या हें काही मनुवादी कर्मठ प्रवृत्तीना पाहवत नव्हते म्हणून या स्त्री शिक्षण चळवळीच्या क्रांतिकारी कार्याला रोखण्यासाठी हें होऊच नं देण्यासाठी या कर्मठांनी धर्माचा आधार घेऊन रोखण्याचा केविलवाणा प्रयत्न केला खरं परंतु हें महत्तम कार्य थांबवणं त्यांना शक्य झालं नाही.स्त्री शिक्षणाचा वसा अंगीकारलेल्या सावित्रीबाईंना घरातून निघाल्या पासून तें शाळेत पोहोचेपर्यंत कर्मठांकरवी अश्लील भाषेत हिनवलं जायचं प्रसंगी नित्यानेच अंगावर चिखल मातीचे गोळे शेणाचे गोळे, दगड धोंडे मारले जायचे तरीही सावित्रीबाई आपल्या अंगीकारलेल्या शिक्षण व्रतातून तसूभरहीं मागे हटल्या नाहीत. कर्मठांचा हा अघोरीं अन्याय सहन करण्यासाठी त्या घरून निघतानाचं बरोबर एक साडी घेऊन जात असे जाताना खराब झालेली साडी शाळेत गेल्यावर बदलून सोबत नेलेली साडी घालत असे एवढा उन्मत्त अन्याय सहन करून या माऊलीने स्त्रियांना शिक्षित केलेच हें विशेष. फुले दांपत्य हें आधुनिक समाज सुधारणावादी विचारांचे पायिक होते त्यांनी कित्तेक अनिष्ठ रूढी परंपरांवर घाव घालून त्यांचं समूळ उच्चाटन करण्यासाठी आयुष्य खर्ची केलं त्यामध्ये महिलांना शिक्षणाची कवाडे खुली करण्यासाठी नेटिव्ह फिमेल स्कुल पुणे या हीं संस्था काढून मुलींची पहिली शाळा सुरु केली तर अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या महार मांग व इतर जातीच्या मुलांना शिक्षण घेता यावे म्हणून त्यांच्यासाठी "दि सोसायटी फॉर प्रमोटिंग दि एज्युकेशन ऑफ महार्स मांग्स अँड एक्सेट्राज "अशा दोन शिक्षण संस्था सुरु केल्या.कर्मठांकरवी फसविल्या गेलेल्या ब्राह्मण विधवा महिलांच्या बाळंतपणासाठी व त्यांच्या मुलांच्या संगोपणासाठी त्यांनी स्वतःच्या राहत्या घरी बालहत्या प्रतिबंध गृह सुरु केले.विधवा महिलांच्या जुलमी केशवपनाविरुद्ध आवाज उठवून हीं प्रथा बंद पाडण्यासाठी समस्त नाभिक समाजाचा संप घडवून आणला,सत्यशोधक समाजाची स्थापना करून हुंड्याशिवाय व पुरोहिताशिवाय कमी खर्चातील सत्यशोधक विवाहाची प्रथा सुरु केली, जाती निर्मूलनासाठी स्वतःच्या घरातील पाण्याचा हौद अस्पृश्यांसाठी खुला केला,बालविवाहांना फक्त विरोध करून न थांबता विधवा स्त्रियांचे पुनर्वीवाह सत्यशोधक पद्धतीने घडवून आणले.



अहो एवढंच काय तर स्वतःला मुलबाळ झाले नाही म्हणून एका ब्राम्हण विधवेचा मुलगा दत्तक घेऊन त्याला उच्चस्तरीय वैद्यकीय शिक्षण देऊन डॉक्टर केले आणि त्याचा या भारतातला पहिला अंतरजातीय विवाह करून दिला. अशा समाजपरिवर्तनवादी फुले दांपत्याच्या समाजहितवादी अनेक कार्याप्रती कृतज्ञता वाटणं साहजिकचं आहे.महात्मा ज्योतीराव फुले हें 'पुणे कमर्शियल आणि कॉर्ट्रॅक्टींग कंपनी'चे कार्यकारी संचालक होते. एक अव्वल दर्जाचे यशस्वी उद्योगपती,व्यापारी आणि नामवंत शेतकरी म्हणून जोतिरावांचा नावलौकिक होता.या कंपनीने धरणं, कालवे, बोगदे, पूल, इमारती, कापडगिरण्या, राजवाडे, रस्ते आदींची भव्य आणि देखणी बांधकामं केली. जोतीरावांच्या उद्योगपती, कार्यकारी संचालक, अर्थतज्ज्ञ आणि शेअर मार्केटविषयक योगदानाकडे जाणकारांचं अद्याप पुरेसं लक्षचं गेलेलं नाही हीं फार मोठी शोकांतिका आहे महात्मा फुले हे स्वतःच्या तेलानं जळणारे सामाजिक कार्यकर्ते होते. वर्गणीवर समाजकार्य करण्याची प्रथा तोवर निर्माण झालेली नव्हती. स्वकष्टार्जित संपत्ती खर्चून त्यांनी समाजकार्य केलं हें वेगळं सांगण्याची गरज नाही.

अशा या कर्मयोगी दांपत्याचा आयुष्याचा शेवटहीं फार वेदनादायी झाला १८८७ च्या काळात महात्मा फुलेना अर्धांग वायुचा त्रास झाला त्यावेळी त्यांनी जवळपास त्यावर मात केलीच होती परंतु शेवटी शेवटी त्यांना उपचारांसाठी आर्थिक मदतीची गरज होती त्यासाठी त्यांचे स्नेही असणारे मामा परमानंद यांनी बडोदा संस्थानचे राजें सयाजीराव गायकवाड यांना पत्र लिहून ज्योतिबा फूलेंना आर्थिक मदत देण्याकरिता पत्र लिहिली होती परंतु दुर्दैवाने कदाचित ती पत्र सयाजीराजे यांना मिळाली नसावी अखेर २८ नोव्हेंबर १८९० साली महात्मा फुलेंचे आजारपणातचं निधन झाले. ज्योतिबांच्या निधनानंतर दत्तक पुत्र यशवंतने टीटवे घेऊ नये म्हणून त्यांच्या पुतण्यांनी विरोध केला असता स्वतः सावित्रीबाईंनी धैर्याने पुढे येत स्वतः हातात टीटवे घेतले व भारतात पहिल्यांदाच एका महिलेने,एका पत्नीने आपल्या पतीच्या चितेला अग्नी देण्याचे धाडस केले. वास्तविक महात्मा फुलेनीं मृत्यू पूर्वी सावित्रीबाईंना सांगितले होते कीं त्यांना मृत्यू पश्चात घरापुढे खोदलेल्या खड्ड्यात मिठामध्ये दफन करण्यात यावे परंतु त्यावेळी पालिकेच्या कर्मचाऱ्यांनीं त्यांचे म्हणणे ऐकले नाही व त्यांना शेवटी अग्नीसंस्कार देण्यासाठी सांगण्यात आले. एवढं होऊनही आपल्या पतीच्या इच्छेचा मान राखून सावित्रीबाईंनी महात्मा फुलेंच्या अस्थी वाजत गाजत घरी आणून घरापुढे खोदलेल्या खड्ड्यात विसर्जित करून त्यावर तुळशीवृंदावन बांधले व त्याच्या पायाशी दोन साध्या दगडाच्या पादुका ठेऊन त्यालाच स्मारक मानलें. महात्मा फुलेंच्या निधनानंतर सत्यशोधक समाजाची धुरा सावित्रीबाईंनी समर्थपणे सांभाळलेली दिसते. त्यांनी सत्यशोधक समाजाचा विचार प्रसार जोमाने केला शेवटपर्यंत त्या कार्य करत राहिल्या. यशवंत डॉक्टर झाल्यावर मिलिट्रीत नोकरीला लागला व त्यानिमित्ताने त्याला निरनिराळ्या देशात जावे लागले दुर्दैवाने ६ मार्च १८९५ रोजी यशवंतच्या पत्नीचे निधन झाले (ज्यांचं लग्न ४ फेब्रुवारी १८८९ मध्ये भारतातला पहिला अंतर्जातीय विवाह म्हणून नोंद आहे ) व सावित्रीबाई पुन्हा एकटया पडल्या. तरीही न डगमगता त्यांनी समाजकार्य सुरूच ठेवले १८९६ साली प्रचंड मोठा दुष्काळ पडला होता ज्यात सावित्रीबाईनीं खुप मेहनत करून सहकार्य केले.१९९७ सालाची सुरुवातच प्लेगच्या महाभयंकर साथीच्या आजाराने झाली.मुलगा डॉ.यशवंतला सावित्रीबाईंनी तात्काळ पत्र लिहून नोकरीतून रजा काढून मायदेशी बोलावले व इथल्या गोर गरीब,शोषित, वंचित आणि दलित रुग्णांची सेवा करण्यासाठी सांगितले.हडपसर परिसरातील ससाऱ्यांच्या माळावर त्यांनी तात्पुरत्या स्वरूपाचा दवाखाना उभारला व रुग्णसेवा सुरु केली. प्लेग हा संसर्गजन्य आजार आहे हें माहिती असूनही त्या स्वतः आजारी लोकांना दवाखान्यात आणत राहिल्या एके दिवशी मुंढवा गावकुसाबाहेर राहणाऱ्या महारवाड्यातील पांडुरंग बाबाजी गायकवाड या मुलाला प्लेगची लागण झालेली कळताच सावित्रीबाई तिकडे धावून गेल्या व त्या मुलाला पाठीवर घेऊन त्या निरागस मुलाचा जीव वाचावा या हेतूने त्या यशवंताच्या दवाखान्याकडे धावत पळत पोहोचल्या. त्या मुलाला तर सावित्रीबांईनी दवाखान्यात पोहोचवलं खरं परंतु त्यातच त्यांनाही प्लेगची लागण झाली आणि दुर्दैवाने १० मार्च १८९७ रोजी रात्री ९ वाजता या ज्ञानमाउलीचे निधन झाले."पाठीवर पुत्राला घेऊन लढलेल्या लक्ष्मीबाईच्या विरगाथा लिहिल्या गेल्या परंतु एका अस्पृश्य समाजातील आजारी पोराला पाठीवर घेऊन त्याचा जीव वाचविण्यासाठी धावणाऱ्या सावित्रीबाईंच्या शौर्याची गाथा मात्र त्या पटीने लिहिली गेली नाही" हीं फार मोठी शोकांतिका आहे.जी माऊली १८४८ ते १८९७ अशी जवळपास ४९-५० वर्ष लोकांसाठी राबली आपलं संपूर्ण आयुष्य खर्ची केलं त्या माऊलीचा शेवट सेवा आणि करुनेचा आदर्श घालून देत झाला. सावित्रीबाईंच्या मृत्यू नंतर मात्र मुलगा डॉ यशवंत एकाकी पडले त्यातून सावरण्यासाठी सत्यशोधक समाजाच्या काही कार्यकर्त्यांनी त्यांचा चंद्रभागाबाईंशी दुसरा विवाह लावून दिला त्यानंतर त्यांना एक मुलगीहीं झाली तिचं नाव लक्ष्मी ठेवण्यात आलं. नोकरी करत असताना त्यांचं ऑक्टोबर १९०६ साली निधन झालं आणि त्यांची पत्नी चंद्रभागा आणि मुलगी लक्ष्मी पोरक्या झाल्या,अनाथ झाल्या त्यांना दैनंदिन गुजरान करणंहीं मुश्किल झालं पर्यायाने त्यांनी घरातील भांडी कुंडी विकून उदरनिर्वाह करु पहिला त्यात ज्योतिबांनीं लिहिलेली पुस्तके देखील त्यांनी रद्दीत विकली, राहिलं साहिलं शेवटी या फुले दांपत्याचं ऐतिहासिक घर हीं त्यांनी अवघ्या १०० रुपयात मारुती देडगे नावाच्या गृहस्थाला विकले. आणि भारताच्या महान क्रांतिकारी फुले दांपत्याच्या सुनेवर नातीसह रस्त्यावर यायची वेळ आली. जगणंहीं मुश्किल होऊन बसलं अशातच त्यांचा रामेश्वराच्या मंदिराच्या दारात फुटपाथवर मृत्यू झाला त्यांचं मयत नगरपालिका प्रशासनाने बेवारस म्हणून केलं मुलगी लक्ष्मीला एका बिजवर असणाऱ्या बाबुराव होले यांच्याशी लग्न करावं लागलं आणि त्याही १९३८ साली वारल्या त्यांच्या पश्चात दोन मुलं होती मुलगा दत्तात्रय होले हें दत्तवाडीत राहतात तर मुलगी मथुरा कोंद्रे या मुंढव्यात.

हजारो अनाथ आणि विधवांच्या आयुष्यात आनंदाचा प्रकाश आणणाऱ्या महात्मा फुले व सावित्रीबाई फुलेंच्या विधवा सुनेला बेवारस म्हणून एका मंदिराच्या दारात मरावे लागते या पेक्षा करूण अंत तों काय?आत्ताच्या स्वार्थी राजकारन्यांसारखं जर महात्मा फुले व सावित्रीबाई फुलेनीं स्वकष्ठातून कामावलेला पैसा मोकळ्या मनाने समाजकार्यात न घालवता संचय केला असता तर त्यांच्या कुटुंबावर हीं वेळ आली असती का ? यातून बोध घ्यायला हवा आजच्या एकविसाव्या आधुनिक व डिजिटल युगात आमच्या माता भगिनी पुरुषांच्या खांद्याला खांदा देऊन सर्व क्षेत्रात गगन भरारी घेताना पाहून आम्हाला फुले दांपत्याची आठवण झाल्याखेरीज राहवत नाही परंतु तरीसुद्धा आजही आमच्या माता भगिनी ज्यावेळी वासनांध अराजक प्रवृत्तीच्या ठगांकरवी वासनेच्या शिकार होतात तेंव्हा आमच्या मुर्दाड धोरणकर्त्यांकडून त्यावर कठोर पावले उचलली जातं नसतील तर या फुले दांपत्याच्या त्यागाचा हा घोर अपमान आहे असं मी मानतो.

# स्त्री शिक्षणाची गंगोत्री सावित्रीमाई फुले



सौ. संध्या ललित भोळे
संपर्क क्र. 7709824170

आधुनिक केसरी


**तू क्रांतीज्योती, तू ध्येयाची मूर्ती, तू ज्ञानाई, तुझ्या ऋणातून कसे व्हावे उतराई? मिळाला हक्क शिक्षणाचा तुझ्या कष्टांमुळे, आद्य आणि वंद्य तू, आमुची लाडकी सावित्री. स्त्री शिक्षणाची गंगोत्री म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पहिल्या महिला शिक्षिका सावित्रीबाई यांचा जन्म 3 जानेवारी 1831 रोजी सातारा जिल्ह्यातील खंडाळा या गावी झाला. महाराष्ट्राच्या सामाजिक सुधारणा चळवळीतील एक महत्त्वाची व्यक्ती म्हणून सावित्रीबाई फुले ओळखल्या जातात. महिलांच्या उन्नतीसाठी स्त्री शिक्षणाला पुढे नेण्याची क्रांतिकारी ज्योत त्यांच्याकडे होती.**

सावित्रीबाई आपली पती जोतीराव फुले यांच्यासह स्त्रियांना शिक्षित करण्याच्या लढ्यात सोबत होत्या. त्यांनी स्त्री शिक्षणाची मशाल त्याकाळी हातात घेतली. म्हणून आजचा दिवस आपण सर्वजण बघत आहोत. सावित्रीबाईंनी 1848 साली पुण्यात भिडे वाड्यात मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. तेथे अभ्यासक्रमात गणित, विज्ञान आणि सामाजिक अभ्यास या पारंपरिक, पाश्चात्य अभ्यासक्रमाचा समावेश होता. सावित्रीबाई आणि जोतीराव फुले यांच्या कार्याला स्थानिक समुदायाकडून मोठ्या प्रमाणात विरोध झाला. सावित्रीबाई अतिरिक्त साडी घेऊन शाळेत जात. कारण त्यांच्या रुढीवादी विरोधामुळे उच्च जातीयांकडून त्यांच्यावर दगड व शेण फेकले जात आणि शाब्दिक हीन दर्जाची वागणूक त्यांना दिली जाई. तरीही त्यांनी स्त्री शिक्षणाचे कार्य अखंडतेने सुरू ठेवले. त्यांची भेट फातिमा शेख यांच्याशी झाल्यावर त्यांनी 1849 मध्ये एकत्रित शाळा उघडली. सावित्रीबाई मुलींना शिक्षण देत आहे, हे लोकांना आवडत नव्हते. प्रचंड अन्याय सहन करून त्यांनी समाजातील विधवा, परितक्त्या, वंचित स्त्रियांसाठी आत्मबल उंचावण्याचे कार्य केले.

समाजातील सर्व महिलांना समान वागणूक मिळावी या हेतूने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी आपल्या घरात 14 जानेवारी 1853 रोजी सार्वजनिक तिळगुळ समारंभ आयोजित केला होता. या वेळेस त्यांनी सर्व जातीतील महिलांना बोलावले होते. केवळ महिलांना घराबाहेर पडता यावे हा एकच उद्देश त्यांचा होता. जोतीबांच्या मनातील पेटत्या ज्योती प्रज्वलित करण्याचे कार्य सावित्रीने केले. ती खऱ्या अर्थाने सामाजिक क्रांतीची प्रखर ज्योत झाली. स्त्रीयांचा आत्मविश्वास वाढावा यासाठी स्त्री शिक्षण गरजेचे आहे हे ओळखून त्यांनी स्त्री शिक्षणाचा टप्पा पती जोतीबा फुले यांच्यासह गाठला. सावित्रीबाईंच्या सामाजिक कार्याबद्दल कृतज्ञता म्हणून महाराष्ट्रात 1995 पासून 3 जानेवारी हा सावित्रीबाईंचा जन्मदिन बालिका दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी सर्व शाळांमध्ये कार्यक्रम आयोजित केले जातात. मुलींचे शिक्षण, प्रगतीचे लक्षण हा सामाजिक हेतू कार्यक्रमातून प्रसारित होतो. मुलींच्या हक्काबद्दल जनजागृती आणि मुलींचा दर्जा उंचावण्यास मदत करणारा 3 जानेवारी हा बालिका दिन सावित्रीच्या कार्याची दखल घेणारा आहे. महिलांचे शिक्षण आणि अधिकार यासाठी सावित्रीबाईंनी दिलेले महत्वपूर्ण योगदान इतिहासाच्या पानावर सुवर्ण अक्षरांनी लिहिले गेले आणि त्यातून महिलांच्या जीवनी आलेले सुवर्णक्षण आज प्रत्येक क्षेत्रात महिलांनी घेतलेली भरारी यातून आपण पाहतो आहे.

विद्या हे धन आहे रे श्रेष्ठ साऱ्या धनाहून,
तिचा साठा ज्यापाशी तो ज्ञानी मानिती जन.

असे म्हणणाऱ्या ज्ञानज्योती कवयित्री सावित्रीबाई



विद्येचे महत्त्व ओळखून होत्या आणि म्हणूनच त्यांनी सकल समाज विद्यावान व्हावा यासाठी संपूर्ण आयुष्य पणाला लावले. सावित्रीबाईंनी बालविवाह, सतीप्रथा, केशवपन इत्यादी अनिष्ट प्रथांना आळा घातला. विद्या नाही ज्ञान नाही, ते घेण्याची आवड नाही, म्हणून बुद्धी चालत नाही, तयास मानव म्हणावे का? असा महत्वपूर्ण प्रश्न आपल्या काव्यातून निर्माण करून अज्ञानाच्या अंधकारात खितपत पडलेल्या स्त्रीयांना मार्ग दाखवणारी विद्येची देवता त्यांचे ऋण भारतीय स्त्री कधीच फेडू शकणार नाही. आज आपण पाहतो स्त्री ही जीवनात कोणत्याही प्रसंगी अविचल राहते आणि धैर्याने संसार तारु पुढे नेते. संयमाचे रान आभाळाचं गाणं प्रेरणेचे पंख लेऊन, विश्वभरारीचा मान आज स्त्रीला मिळाला आहे. स्त्री शक्ती म्हणून सर्वदूर गौरवली जाते आणि याच सारे श्रेय आपल्या सावित्री आईलाच. होती साऊ आऊ, म्हणूनच सारे घडले, नेत्र दीपक यशाचे, तेजनभांगणी पडले. जोतीरावांच्या मृत्यूनंतर त्यांनी सत्यशोधक समाज या संस्थेद्वारे ज्योतिरावांचे विचार पुढे नेले . सामाजिक कार्यात स्वतःला वाहून नेत असतानाच प्लेगच्या रुग्णांची सेवा करताना 10 मार्च 1897 रोजी सावित्रीबाईंचा मृत्यू झाला. सावित्रीबाईंमुळे प्रत्येक घरातील मुलगी शिकली आणि आज प्रत्येक क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत. अशा या थोर विभूतीस माझे शत शत नमन.

# होय! मी सावित्री बोलतेय!

आधुनिक केसरी

**'अग ऐ मुलींनो कुठे खिदळताय? इकडे या! मी तुम्हाला एक गोष्ट सांगते. या! मी कोण? अगं, मी तुमची सावित्रीमाता. तुम्ही नायका मला क्रांतीज्योती सावित्रीमाई म्हणत? हो तीच. तुम्ही सगळ्यांनी मला 'माय' म्हणून हाक मारलीत तेंव्हा मी सर्वांची आई झाले. माई झाले. इथल्या सर्वच लेकरांनी मला माता मानले आणि मी धन्य झाले. मला विद्येची खरी माता म्हणतात. पण मी तुम्हा सर्वांच्या रंजलेल्या-गांजलेल्या दुःखाची सुखपौर्णिमा म्हणजेच सावित्री ज्योतीराव फुले! तुमची क्रांतीज्योती सावित्रीमाई!' माझा जन्म ३ जानेवारी १८३१ साली सातारा जिल्ह्यातल्या खंडाळा तालुक्यातील नायगांव या छोट्याशा खेड्यात झाला.**

आईचं नाव लक्ष्मीबाई आणि वडिल खंडोजी नेवसे पाटील. मी सर्वात मोठी आणि एकुलती एक. मला तीन भाऊ- सदा, सखाराम आणि श्रीपती. मी एकुलती एक असल्यामुळे खूप लाडाकौतुकात वाढले. मला लहानपणी साऊ म्हणायचे. माझे बाबा फार कनवाळू होते. ते फार कष्ट करीत. त्यांचा फार दबदबा होता. ते लोकांना मदत करायचे. एकदा मी बाबांबरोबर शिरवळच्या बाजारात गेली होती तेंव्हा एका ख्रिश्चन मिशनऱ्यानं एक पुस्तक मला दिलं. पण मला काही वाचता येईना. मी नुसते चित्र पाहत राहिली. मला फार वाईट वाटलं होतं तेंव्हा. मला वाचता येत नव्हतं ही गोष्ट मला खात राहिली. माझं काहीतरी हरवत चालल्याचं मला जाणवत होतं.

दिवसामागून दिवस गेले. बालविवाहाच्या प्रथेप्रमाणे माझ्या वयाच्या नवव्या वर्षी १८४० साली माझं लग्न पुण्याच्या ज्योतिरावांशी झालं. त्यांचं आईचं छत्र लहानपणीच हरवलं होतं. सासरे गोविंदराव फुले प्रेमळ व्यक्तीमत्त्व होतं. पण लग्न, संसार काय असतो हे कळायच्या आतच माझं लग्न झालं होतं. पण ती एक माझ्यासाठी क्रांतीकारी घटना होती. मी ह्यांना शेटजी म्हणायचे. ते शिकलेले होते. म्हणूनच मला सावित्री ज्योतिराव फुले असं नवं नाव धारण करण्यात मला फार अभिमान वाटला. मला माझा नवा जन्म झाल्यासारखंच वाटलं. मी सासरी आले तरी माहेरीच आल्याची ती एक नवी अनुभूती होती. शेटजी शिकत असताना गोविंदराव फुले सनातन्यांच्या धर्मद्रोहाच्या आरोपाखाली जखडले गेले. शेटजींचं शिक्षण तुटलं. क्षुद्रानं अतिशुद्रानं शिक्षण घेण्याचा कोणताच अधिकार नव्हता. अस्पृश्यांची आणि स्त्रियांची अवस्था काही वेगळी नव्हती. धर्मव्यवस्थेच्या काळचक्राखाली सगळेच भरडले जात होते. पण शेटजींना शिक्षणाचं मोल फार होतं. ते लग्नानंतर १८४१ साली स्कॉटिश मिशनच्या शाळेत शिकू लागले. मी ही शिकावे असे त्यांना मनापासून वाटे. पण ते शक्य नव्हतं.

मी जेंव्हा शेतात ह्यांची दुपारची भाकर घेऊन शेतावर जात असे ते मला काळ्या मातीवर अक्षरं गिरवायला सांगत. तीच माझी पहिली शाळेची पाटी. मी फार जिद्दी होते. भराभरा शिकले. माझ्या शिकण्याच्या उमेदीनं शेटजी हरकून जात आणि मला खूप-खूप शिकवत. मला आता चांगलंच वाचायला आणि लिहायला येऊ लागलं. मला शिरवळच्या बाजारात भेट म्हणून मिळालेलं पुस्तक मी वाचून काढलं. ते मी आजपर्यंत प्राणपणानं जपून ठेवलं होतं. माझ्या आयुष्याला एक महान वळण देणारा तो एक क्रांतिकारी दिवस होता. माझी पावलं उजेडाच्या दिशेनं पडत होती. शिक्षणानं माझ्याभोवती तेजपुंजाचं वलय निर्माण झालेलं होतं. एक नवी शक्ती मला मिळालेली होती. एका नव्या स्वातंत्र्याच्या उंबरवठ्यावर मी उभी होते. मला एका महायुद्धाची नायिका व्हायचं होतं. मला थांबायचं नव्हतं, मला एकेक युद्ध जिंकत पुढेच जायचं होतं.





हा सर्वस्वी माझाच निर्णय होता. हा एका नव्या महाक्रांतीचाच आरंभ होता. शेटजींनी तो आपल्या स्वतःच्याच घरापासून केलेला होता.

शेटजी नावाच्या या क्रांतीपुरुषानं माझ्या क्षणांना नवं वळण दिलं. एका रात्री निर्णय झाला. शाळा काढायचं ठरलं. पण जितके प्रश्न होते तितकी संकटं उभी राहिली होती. पण त्यांचा विचार न करता नेटीव्ह फिमेल स्कूल, पुणे आणि महार, मांग इत्यादींना शिकविणारी मंडळी, पुणे अशा दोन संस्था काढल्या. आम्ही पहिली मुलीची शाळा काढली त्यात सहाच मुली होत्या. त्यांना शिकवायला शिक्षकच मिळेना. मग मीच शिकवायचं काम केलं. त्या कोणकोण होत्या सांगू का? बरं. एक होती अन्नपूर्णा, सुमती, दुर्गा देशमुख आणि माधवी, सोनू पवार आणि जानी. ह्या तुमच्यासारख्या माझ्या लेकीच! यातल्या चार ब्राह्मण तर एक धनगर आणि एक मराठा. मी यात कोणताच भेद केला नव्हता. त्या ज्या समाजातून आल्या होत्या तिथूनच मला प्रचंड विरोध झाला. पण त्या लेकीनं मला आई मानलं आणि मी अगदी अधिकारानं त्यांना शिकवू लागले.

शुद्रातिशुद्राच्या मुलामुलींना शिकवू नये, धर्म बुडतो. भयंकर अनर्थ घडून येतो. आता सर्वांचा नाश अटळ आहे, असे म्हणून सनातनी वृत्तीच्या लोकांनी माझा छळवाद मांडला. मला खूप त्रास होत होता. शेटजींना तर त्याहीपेक्षा जास्त. आम्हाला ह्या लोकांनी घाणेरड्या, अर्वाच्च शिव्या दिल्या. मला दगड, धोंडे फेकून मारले. माझं एकदा डोकं फुटलं. मी रक्तबंबाळ झाले. तशीच मी शाळेत आले. मला शेण फेकून मारलं, मला त्याचंही काहीच वाटलं नाही. ते लोक अंगावर चिखल फेकत त्याचंही काही वाटत नव्हतं. मी जातानाच एक लुगडं सोबत न्यायची. असेच शाळेत जात असताना एक मुजोर पोरगा माझ्या वाटेत आला. त्याने माझ्या अंगावर हात टाकायचा प्रयत्न केला. एव्हाना बरेच बघे मंडळी जमली होती. ती माझ्यावर फिदी फिदी हसत होती. मी प्रसंगावधानान त्याच्या थोबाडात कच्चून दिली. मी ही नेवासे पाटलांची लेक होते. माझं वाघिणीचं काळीज होतं. मुलींनो तुम्ही पण बिल्कूल घाबरायचं नाही. तुमचा हातच तुमचं शस्त्र आहे. अशा नराधमांचा त्वेषाने प्रतिकार करा. कुण्याही गोडबोल्याला भुलू नका. भूलथापाला बळी पडू नका. स्वतःच्या आयुष्याचं मातेरं करुन घेऊ नका. मी शिकवित होते, मुली शिकत होत्या. मला त्याचा फार आनंद होत होता. त्यासाठी मी माझं सर्वस्व पणाला लावलं होतं. मी दुःख पूर्णपणे विसरुन गेले होते. हे धर्मवादी लोक जितका आमचा छळ करीत तितके आम्ही त्वेषाने कामाला लागत असू. एवढ्यात कुणीतरी माझ्या सासऱ्याचे कान भरले. आम्हाला घराबाहेर काढण्यात आलं. तेंव्हा मुन्शी गफार बेग चाचानं आम्हाला आसरा दिला. मग आम्ही नव्यानं सुरुवात केली. न भिता न घाबरता मोठ्या जोमानं आम्ही कामाला लागलो. आम्ही एकूण १८ शाळा काढल्या. एक अध्यापिका विद्यालय काढलं. पडदानशीन मुस्लीम समाजातील फातीमा ही पहिली प्रशिक्षीत शिक्षिका झाली. लऊजी मांग आणि रानबा महार यांचंही सहकार्य आम्हाला फार मिळालं. गणू मांग आणि धुराजी चांभार हे शिक्षक म्हणून काम करु लागले. आमच्या शाळा जोरात सुरु होत्या. या शाळांच्या माध्यमातून तत्कालीन समाजव्यवस्थेचं कंबरडं मोडण्याचच काम आम्ही सगळे करीत होतो. आमच्या शाळेत युद्धसैनिक तयार होत होते. तुमच्या सारखीच एक मुक्ता साळवे नावाची मातंग समाजातील मुलगी माझ्याकडे आली आणि मला म्हणाली, मला निबंध लिहायचा आहे. मला प्रचंड आनंद झाला. ती अकरा वर्षाची मुलगी प्रचंड प्रतिभावान होती. तिच्यात एक सावित्रीच जन्माला आली होती. तिनं ह्या व्यवस्थेला खडा सवाल केला होता. शेटजी खूप खुष झाले होते. आम्ही पेरलेली क्रांतीबीजं आता शिवारु लागली होती. एक विचारांचा क्रांतीवात घोंघाऊ लागला होता एवढी ताकद शिक्षणात आहे. याचा फायदा फार महान आहे. पशूचा मानव होतो. माणसात जे परिवर्तन घडून येतं ते कायमस्वरुपी असतं. शाश्वत असतं. आम्हाला मारायला दोन माणसं पाठविली होती. धोंडीराम कुंभार आणि रोडे रामोशी. आम्ही त्यांचं असं परिवर्तन केलं की, तेच आमचे अंगरक्षक झाले. मुक्ताचा निबंध 'ज्ञानोदय' मध्ये शासनाच्या वार्षिक अहवालात प्रकाशित झाला. तसेच ना.वि. जोशींनीही तो 'पुणे शहराचं वर्णन' या ग्रंथात छापला. ऐ! तुम्हाला लिहिता येतो का गं निबंध? मुलींनो, तुम्ही खूप-खुप शिका! मोठ्या व्हा! नवनव्या संधी तुमच्या पुढे आहेत. चुकूनही वाकडं पाऊल पडू देऊ नका. समाज फार विचित्र आहे. काशी नावाच्या विधवेला दिवस गेले तेंव्हा तिचं सगळं पार पाडण्यात आमचे काय हाल झाले ते मलाच माहित! आम्ही तेंव्हापासून बाळांतघर आणि पाळणाघरे चालविली. आम्ही रोग्यांची सेवा केली. बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली. विधवा विवाहाचा पुरस्कार केला. नुसते बोललोच नाही तर जे बोललो ते करुन दाखविलं. केशवपन थांबवलं, टाकलेल्या स्त्रियांसाठी अनाथालयांची स्थापना केली. पोरींनो तुम्हालाही माझं काही देणं आहे. समाज ऋण फेडण्यासाठी या महायुद्धात उतरा! माझा वसा घ्या! सावित्रीच्या लेकी म्हणून जगात नाव कमवा!!

प्रज्ञाधर ढवळे
९८९०२४७९५३

# कोरेगाव-भीमा येथे साजरा झाला २०६ वा शौर्य दिन

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो, शूर वीरांचा विजय असो आणि जय भीमचा जयघोष करत कोरेगाव-भीमा येथे मोठया संख्येने दाखल झालेल्या भीम अनुयायांकडून विजय स्तंभास अभिवादन करण्यात आले. शूरांच्या पराक्रमास तसेच शहीद झालेल्या शूरवीरांना मानवंदना देण्यासाठी महाराष्ट्र राज्यातील कानाकोपऱ्यातूनच नव्हे तर बाहेरील राज्यातून आलेल्या भीम अनुयायांकडून हात जोडून तसेच सलामी देऊन विजय स्तंभास अभिवादन करत २०६ वा शौर्यदिन साजरा करण्यात आला.३१ डिसेंबरच्या रात्री ठीक बारा वाजता विजयस्तंभास मानवंदना देण्यात आली.यावेळी रात्रीच्या सुमारास सुध्दा प्रचंड स्वरूपाचा जन समुदाय हा भीम अनुयायांचा पाहायला मिळाला.शुरवीरांच्या पराक्रमाचे स्मरण करण्यासाठी जमलेल्या अनुयायानी मोठया उत्साहपूर्ण वातावरणात शूरवीरांचा जयघोष केला. पुणे जिल्ह्यातील भीमा नदीच्या काठी वसलेल्या कोरेगावच्या विजय स्तंभास अभिवादन करण्यासाठी मोठ्या प्रमाणात भीम अनुयायी व जनसमुदाय



हा दरवर्षी १ जानेवारी रोजी कोरेगाव-भीमा येथे दाखल होत असतो.नव्या वर्षाची सुरुवातच विजय स्तंभास अभिवादन करून होत असते.कारण १ जानेवारी १८१८ साली एक ऐतिहासिक असा पराक्रम महार रेजिमेंटच्या शूरवीरांनी घडविला होता.याच पराक्रमाची आठवण १ जानेवारी रोजी समाज मनाला होत असते.१८१८ च्या लढाईत शहिद झालेल्या शूरवीरांना मानाचा,अभिमानाचा आणि सन्मानाचा मुजरा करण्यासाठी गेली दोन दिवसापासून म्हणजेच ३१ डिसेंबर आणि १ जानेवारी रोजी लोकं या विजय स्तंभापाशी येत असतात.शौर्याचे प्रतिक असलेल्या विजय स्तंभास अभिवादन करत असताना एका पराक्रमी कामगिरीची प्रेरणा मिळत असल्याचे भीम अनुयायी म्हणत असतात.अगदी रुबाबात भीम अनुयायी या परिसरात दाखल होत असतात.शुभ्र वस्त्र परिधान केलेले,डोक्यावर निळी टोपी,गळ्यात निळा मफलर गुंडाळून व हातात निळा ध्वज आणि पंचशील ध्वज घेऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो, शूर वीरांचा विजय असो च्या अभिवादन पर देण्यात येणाऱ्या जय घोषाने परिसर अगदी जणू दणाणून गेला होता.

लहानां पासून ते अबालवृध्दां पर्यंत ग्रामीण भागातील महिला पुरुषांची मोठ्या प्रमाणात हजेरी दिसून येत होती.विजयस्तंभास अभिवादन करण्यासाठी रात्री पासूनच लोकं एकत्रित आलेले होते.शिवाय दर्शन रांगेतून जय भीमचा जयघोष करतांना भीम अनुयायांमध्ये एक वेगळा जोश पाहायला मिळाला.लोकं दर्शन रांगेतून जसजशी पुढे जात होतं होती तशी तशी अभिवादन करण्याची मोठी तळमळ पाहायला मिळत होती.यावेळी विविध सामाजिक आणि राजकीय संघटनाकडून अभिवादन करत असताना समाज प्रबोधन पर गीत गायन कार्यक्रमाचे आयोजन सुध्दा करण्यात आलेले होते. भीमा कोरेगाव केले,भीमा कोरेगाव या गाण्याचे सूर तर आलेल्या भीम अनुयायांच्या गर्दीत जणू गुंजतच होते.खास वैचारिक मेजवानी म्हणून विविध पुस्तकांचे स्टॉल सुद्धा विविध पुस्तकांनी सजलेले होते.भीमा कोरेगाव चा इतिहास,डॉ.बाबासाहेब आंबेडकर, तथागत गौतम बुद्ध तसेच इतर महापुरुषांच्या जीवनचरित्रावर आणि वास्तववादी पुस्तकांचा खजिनाच स्टॉल वर दिसून आला.विजय स्तंभाची आकर्षक अशी सजावट फुलांनी करण्यात आली होती.भीम अनुयायांनी स्वतःच्या मोबाईल मध्ये विजय स्तंभास सोबत फोटो घेतले.२०६ वा शौर्य दिन संपन्न होत असताना शूरवीरांना अभिवादन करता करता भीम अनुयायांनी पुस्तकांची खरेदी,महामानवाच्या प्रतिमा आणि नवीन वर्षाची दिनदर्शिका घेतली.या विजयस्तंभाकडून क्रांतिकारी प्रेरणा घेत अनुयायांनी निरोप घेतला.

**१९२७ साली भारतरत्न डॉ .बाबासाहेब आंबेडकरांची विजय स्तंभास भेट :** १ जानेवारी १८१८ साली पेशव्यांच्या विरोधात इंग्रजांची लढाई झाली होती .तेव्हा महार रेजिमेंट ने या लढाईत सहभाग घेतला होता .इंग्रजांनी हे युद्ध जिंकले होते .या लढाईत महार रेजिमेंटचे २० शूरवीर शहिद झालेले होते .या लढाईच्या स्मरणार्थ शूरवीरांना अभिवादन करण्यासाठी कोरेगाव भीमा येथे इंग्रजांकडून विजय स्तंभ बांधण्यात आला होता .हा इतिहास डॉ . बाबासाहेब आंबेडकरांना ज्ञात झाल्यानंतर १ जानेवारी १९२७ साली डॉ .बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या सहकाऱ्यांसमवेत या विजय स्तंभास भेट देऊन शूरवीरांना अभिवादन केले होते .तदनंतर हा दिवस दरवर्षी शौर्याचे प्रतिक समजत 'शौर्य दिन' साजरा केला जात असतो .



# शासनाने तो कायदा रद्द करावा

## ड्रायव्हर संघटनेच्या वतीने निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** अपघात झालेल्या व्यक्तीला सोडून गेल्यास ड्रायव्हर विरोधात नवीन दंड व शिक्षा कायदा सरकार आणत आहे.तो कायदा रद्द करण्यात यावा यासाठी लोणार येथे ड्रायव्हर संघटने कडून निवेदन देण्यात आले.

सध्या सरकारने जो निर्णय घेतला आहे की अपघात झाल्यानंतर ड्रायव्हर जर अपघात झालेल्या व्यक्तीस घटनास्थळी सोडून गेल्यावर ड्रायव्हरला 10 वर्षे सजा सात लाख रुपये दंड जो कायदा आणता आहे तो कोणत्याही ड्रायव्हरला मान्य नाही ड्रायव्हर जाणूनबुजून अपघात करत नाही जर ड्रायव्हर कडे एवढे पैसे असतं तर ड्रायव्हरने नोकरी केलीच नसती असा कायदा आणने ही खुप ड्रायव्हर साठी शोकांतीका आहे. अपघात हे नजरचुकीने होतात व अपघात झाल्यास चालकास उपस्थित नागरिक मारहाण करते या भितीमुळे चालक तेथून पळुन जातात. त्यामुळे चालकास इतकी मोठी शिक्षा देणे त्याच्यावर अन्यायकारक ठरेल. म्हणुन सदरील घेतलेला निर्णय रद्द करण्यांत यावा यासाठी असे निवेदन जय संघर्ष वाहन चालक, चालक मालक संघटनाच्या वतीने लोणार तहसीलदार व लोणार पोलीस स्टेशनचे ठाणेदार यांच्या कडे देण्यात आले.यावेळी संघटनेचे अध्यक्ष हुसेन भाई चौधरी, उपाध्यक्ष संतोष फोलाने, सचिव रामेश्वर सांगळे सह तालुक्यातील सर्व ड्रायव्हर मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिशु विकास मंदिरच्या मुख्याध्यापिका कामिनी किशोर कुलकर्णी सेवानिवृत्त

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** महिला मंडळ औरंगाबाद, संचालित शिशु विकास मंदिर माध्यमिक शाळा, श्रेयनगर छत्रपती संभाजी नगर शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. कामिनी किशोर कुलकर्णी ह्या नियत वयोमानानुसार 31 डिसेंबर 2023 रोजी सेवानिवृत्त झाल्या.

सेवानिवृत्ती निमित्त महिला मंडळ औरंगाबाद संचालित शिशु विकास मंदिर माध्यमिक शाळा, श्रेयनगर येथे सेवा गौरव सोहळा संपन्न झाला. याप्रसंगी महिला मंडळ औरंगाबाद संस्थेच्या अध्यक्षा शालिनीताई देशपांडे, उपाध्यक्षा कमलताई संकलेचा, उषाताई देशपांडे, सचिव सुलोचनाताई नाईक, मंदाताई देशपांडे, मीनाक्षी सराफ, करुणा वैद्य हे पदाधिकारी उपस्थित होते. तसेच शिशु विहार माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापिका ज्योती टाकळकर, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका घटाळे मॅडम, शिशु विकास प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका मैनाबाई काटकर, माजी ज्येष्ठ शिक्षक शिक्षिका व कामिनी कुलकर्णी यांचे आप्तस्वकीय उपस्थित होते. या प्रसंगी अंजली जाधव यांनी सेवा गौरव मूर्तींचा परिचय करून दिला.

कामिनी किशोर कुलकर्णी यांनी शिशु विहार माध्यमिक शाळा, औरंगपुरा येथे सहशिक्षिका तसेच शिशु विकास मंदिर माध्यमिक शाळा, श्रेयनगर शाळेत पर्यवेक्षिका व मुख्याध्यापिका पदस्थ दिलेली जवळपास 34 वर्षांची सेवा संस्मरणीय अशीच आहे. गणित त्यांचा मनस्वी आवडीचा विषय! वास्तविक गणित विषय अवघड म्हणून गणला जातो, मात्र त्यांच्या अध्यापनातून सूत्रमय कौशल्याची सहजता व सुलभता दिसून आली. या सर्व कार्याचे फलित म्हणजे संस्कृती संवर्धन व भारत विकास परिषदे तर्फे देण्यात आलेला विशेष गौरव पुरस्कार, गुरुवर्य चिपळूणकर प्रबोधिनी औरंगाबादतर्फे देण्यात आलेला धडपडणारे शिक्षक पुरस्कार, साथी सेवा संस्थेतर्फे आदर्श शिक्षिका पुरस्कार, रोटरी क्लब ऑफ औरंगाबाद तर्फे नेशन बिल्डर अवॉर्डने सन्मानित करण्यात आले.

त्यांच्या कार्याचा सेवा गौरव म्हणून संस्थेच्या वतीने त्यांना सेवा सन्मानपत्र प्रदान करण्यात आले .सन्मान पत्राचे वाचन माधवी जंगले यांनी केले.याप्रसंगी शाळेचा विद्यार्थी अद्वय रोंघे व शिक्षिका रागिणी रामपुरीकर, क्रीडा शिक्षक डी .आर .खैरनार, शिक्षकेतर कर्मचारी भारत चाटे कामिनी कुलकर्णी मॅडम यांचे यजमान किशोर कुलकर्णी व आप्तस्वकीय ,ज्योती टाकळकर, मेढेकर मॅडम यांनी आपले मनोगत व्यक्त ककेले.सेवा गौरव मूर्ती म्हणून कामिनी कुलकर्णी यांनी ही आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचा समारोप संस्थेच्या सचिव सुलोचनाताई नाईक यांच्या मनोगताने करण्यात आला.या कार्यक्रमा प्रसंगी विद्यार्थ्यांनी बनविलेली कागदी फुले, गुच्छ ,ग्रीटिंग कार्ड्स कुलकर्णी मॅडम यांना रेशमा जाधव व विद्यार्थ्यांनी भेट दिले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला स्वागत गीत व फेअरवेल सॉंग जयश्री केवट मॅडम व विद्यार्थिनींनी सादर केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मेहनत घेतली.




# ज्ञानज्योतीच्या नायगावात जयंती सोहळा; मुख्यमंत्री एकनाथ शिंदे राहणार उपस्थित

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** भारतातील आद्य स्त्री शिक्षिका व स्त्री शिक्षणाच्या जनक आणि नायगावची थोर सुकन्या ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले यांची १९३ वी जयंती आणि भारतीय स्त्री मुक्ती दिनाचे औचित्य साधून बुधवार दि. ३ जानेवारी २०२४ रोजी सकाळी १०.३० वा. ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले यांचा जयंती सोहळा आयोजित केला आहे. हा जयंती सोहळा महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री अजित पवार, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, राज्य उत्पादन शुल्क,महाराष्ट्र राज्यमंत्री तथा सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई, गृहनिर्माण, इतर मागास बहुजन कल्याण विभाग महाराष्ट्र राज्यमंत्री तथा अध्यक्ष महाज्योती नागपुर) अतुल सावे, महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर, नरेंद्र पाटील, यांच्या शुभहस्ते संपन्न होत आहे. खा. श्रीनिवास पाटील, खा.श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले, खा.रणजितसिंह नाईक-निंबाळकर, आ.पृथ्वीराज चव्हाण, आ.रामराजे नाईक निंबाळकर, आ.शशिकांत शिंदे, आ.श्रीमंत छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले,आ.जयकुमार गोरे, आ.गोपीचंद पडळकर,आ.महेश शिंदे, आ.अरुण लाड, आ.संग्रामदादा थोपटे, माजी मंत्री महादेव जानकर, माजी मंत्री राम शिंदे, कमलताई ढोले पाटील, माजी मंत्री विजयसिंह मोहिते पाटील, आ.बाळासाहेच पाटील, आ.मकरंद पाटील, आ.दिपक चव्हाण, आ.जयंत आसगावकर, आ.मनिषा चौधरी, माजी आमदार मदन भोसले, योगेश टिळेकर, खा समीर, भुजबळ आदींची प्रमुख उपस्थिती असणार आहे. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी,मुख्य कार्यकारी अधिकारी ज्ञानेश्वर खिलारी, महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक राजेश खवले, पोलीस अधिक्षक समीर शेख,प्रांत अधिकारी राजेंद्र जाधव, तहसीलदार अजित पाटील,सातारा शिक्षणाधिकारि शबनम मुजावर, गटविकास अधिकारी अनिल वाघमारे, पोलिस निरीक्षक नवनाथ मदने, मा.श्री. उपकार्यकारी अभियंता रणजित चांदगुडे, महात्मा फुले समता परिषदेचे बापुसाहेब भजबळ,मा.नगराध्यक्ष नामदेवराव राऊत,सावता परिषदेचे अध्यक्ष कल्याणराव आखाडे,अ. भा.माळी संघाचे अध्यक्ष अविनाश ठाकरे,गटशिक्षणाधिकारी सुजाता जाधव,उपअभियंता जि. प.बांधकाम विभाग व्ही.डी. शिंदे,उपअभियंता जि. प.बांधकाम विभाग वाय. एस.काटकर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.तसेच जिल्ह्यातील सर्व मान्यवर, जि.प. सदस्य, पंचायत समितीचे सभापती, उपसभापती, सदस्य, विविध गावचे सरपंच, कार्यकारी सोसायटीचे चेअरमन,सर्व हितचिंतक, अधिकारी व पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

# शेखपूरला विवाहितेची आत्महत्या; गावात हळहळ

आधुनिक केसरी न्यूज



**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील मौजे शेखपूर येथे वर्षांच्या आखेरला विवाहीता ज्योती राजेंद्र पवार २५ हिने आड्याला दोरीने गळफास घेऊन दि.३१ शनिवारी सकाळी १० वाजेच्या सुमारास आत्महत्या केली.जवळ दिडवर्षाची मुलगी असताना हा प्रकार घडल्याने गाव परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. शनिवारी घरी सकाळी १० वाजेच्या सुमारास मुलगी रडत असल्याने दिर शुभम पवार याने बाहेरुन मुलगी का रडत आहे असे आवाज दिला. तरीही आतमधून प्रतिसाद मिळत नसल्याने डोकावून पाहिले तर तेव्हां हा प्रकार समोर आला तेंव्हा त्यास उपचारासाठी दवाखान्यात नेण्यात आले मात्र तपासणी करून डॉक्टरांनी मृत घोषित केले शवविच्छेदनानंतर शेखपूर येथे पाच वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.सुखी संसर असताना हा प्रकार का व कसा घडला याचे कारण अस्पष्ट आहे. या प्रकरणी स्थानिक पोलीसांनी दखल घेत पुढील तपास करत आहे.

# सुसज्ज दुय्यम निबंधक कार्यालय इमारतीचे भूमिपूजन

## आमदार मेघना साकोरे बोर्डीकर : कार्यालय स्वच्छ ठेवण्यासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**बि.डी.रामपूरकर**

**जिंतूर :** मतदार संघामध्ये अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या दुय्यम निबंधक कार्यालय इमारतीच्या संदर्भात वेळोवेळी पाठपुरावा केल्याने आमदार मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या प्रयत्नातून 2 कोटी रुपयांची प्रशस्त इमारत तहसील कार्यालय आवारामध्ये सार्वजनिक बांधकाम उपविभाग, जिंतूर या यंत्रणेमार्फत बांधण्यात येणार आहे या भूमिपूजन प्रसंगी तहसीलदार राजेश सरवदे, दुय्यम निबंधक शरद यादव, माजी नगराध्यक्ष सचिन गोरे, डॉ.पंडित दराडे,लक्ष्मण बुधवंत, सुनील भोंबे,उप अभियंता उमरेकर,शाखा अभियंता,तसेच सुनील मते,रवी घुगे,मतीन तांबोळी आदी मान्यवर याप्रसंगी उपस्थित होते.

आपल्या भाषणामध्ये आमदार मेघना साकोरे बोर्डीकर यांनी सर्वच शासकीय इमारती या आदरणीय देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या संकल्पनेनुसार स्वच्छ भारत अभियान याप्रमाणे आपली कार्यालय स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी कार्यालयातील प्रत्येक अधिकारी आणि कर्मचारी यांनी पुढाकार घेण्याचे आवाहन याप्रसंगी केले. तसेच मराठा आरक्षणा संदर्भात मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे यासाठी लढा उभा केलेला आहे यासाठी राज्यातील मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे,उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि अजित दादा पवार हे मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे यासाठी आग्रही असून मागास आयोग स्थापन करून यांच्यामार्फत ग्रामीण भागामध्ये सर्वे करण्यात येणार असून यासाठी आपण सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहन देखील याप्रसंगी त्यांनी केले आहे.



तसेच मराठा समाजाला आरक्षण प्रथम कुणी दिले असेल तर ते राज्याचे तत्कालीन माजी मुख्यमंत्री आणि आत्ताचे उपमुख्यमंत्री आदरणीय देवेंद्रजी फडणवीस यांनीच दिलेले आहे आणि आत्ताचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांनी तर छत्रपती शिवाजी महाराज यांची शपथ घेऊन मराठा समाजाला आरक्षण दिल्याशिवाय स्वस्त बसणार नसल्याचे यापूर्वीच त्यांनी सांगितलेले आहे याचा पुनरुच्चार देखील आमदार मेघना साकोरे बोर्डीकर यांनी यावेळी केला.

# हिट अँड रन कायदा रद्द करण्याची वाहनचालक संघटनेची मागणी

## पेट्रोल डिझेल भरण्याकरिता पंपावर रांगा

आधुनिक केसरी न्यूज



**पिशोर :** केंद्र सरकारने देशातील वाहन चालकांच्या बाबतीत नुकताच लागू केलेला, 'हिट अँड रन'हा कायदा रद्द करण्यात यावा किंवा यातील जाचक अटी शिथिल करण्यात याव्यात, अशी मागणी जय संघर्ष वाहन चालक सामाजिक संस्थेच्या वतीने करण्यात आली आहे. या संदर्भात निवासी तहसिलदार मोनाली सोनवणे यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, अपघात घडल्यास जखमींना मृत्यूच्या दारात सोडून, पळून जाणे हे कुणालाही पटण्यासारखे मुळीच नाही. मात्र स्वतः चा जीव वाचविण्यासाठी धडपड करणे हा गुण, प्रत्येक प्राणीमात्रात जन्मजात असल्याने, वाहन चालक (ड्रायव्हर) हा केवळ स्वतःचा जीव वाचविण्याच्या भीतीने, घटनास्थळापासून पळ काढतो. मात्र शासनाने हा कठोर कायदा करतांना, वाहन चालकांच्या जीवाचा विचार केलेला दिसत नाही. सबब प्रथमतः ड्रायव्हर (वाहनचालक) सुरक्षा कायद्याची अंमलबजावणी करावी आणि त्या नंतर हिट अँड रन या नवीन कायद्यात कारावासाचा कालावधी आणि आर्थिक दंड कमी करूनच हा नवीन कायदा लागू करावा. अशी विनंती निवेदनाच्या शेवटी करण्यात आली आहे. या निवेदनावर संदीप वाघ, अकबर सय्यद, सुनिल शिरसाठ, शहेबाज शेख, रिजवान शेख, अजीम पठाण, अभिजित पगार, अजिम पठाण, यांच्या अजय काकडे, सागर गोरे, शिवाजी मोरे, राहुल बनकर, आकाश रगडे, सचिन ढोले, अक्षय मोरे, अकलाख खां. आणि शेख समीर आदींचा समावेश आहे.

त्यात बरोबर तालुक्या सह जिल्ह्यात या बाबत ची कुनकुन लागताच सर्वच पेट्रोल पम्पा वर वाहन चालक गरजे पेक्षा अधिक पेट्रोल डिझेल आपल्या वाहनात टाकत असल्याचे चित्र कन्नड तालुक्यात पहवायत मिळत आहे, त्यामुळे पेट्रोल पंपा वर भल्या मोठ्या प्रमाणावर वाहनाची गर्दी दिसत आहे.



# विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** येथून जवळ असलेल्या विल्हाडी येथील शिक्षणप्रेमी तथा सामाजिक कार्यकर्ते बाबासाहेब इनामे यांनी एक जानेवारीला आपल्या वाढदिवसानिमित्त होणाऱ्या अनाठायी खर्चाला फाटा देत विल्हाडी येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना वही, पेन, पेन्सिल यासारखे शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. बाबासाहेब इनामे हे नेहमीच सामाजिक कार्यात अग्रेसर असतात. आपण समाजाचे देणे लागतो या भावनेतून त्यांनी विद्यार्थ्यांना मदत केली.ग्रामीण भागातील मुलांना शिक्षणात अडीअडचणी येऊ नये म्हणून त्यांची नेहमीच सहकार्यांची भावना असते. विद्यार्थ्यांना मोफत शालेय साहित्य वाटप केल्याबद्दल त्यांचा या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष भगवानराव कान्हेरे,उपाध्यक्ष संजय खरात,मुख्याध्यापक सोनटक्के सर,सरपंच ममताबाई इनामे व समस्त ग्रामस्थ,शिक्षकवृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# राजापूर तालुक्यातील गावांत रस्ता भूमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज

**राजापूर :** भारतीय जनता पार्टी राजापूर तालुका माननीय प्रमोद जठार साहेब यांच्या प्रयत्नाने मौजे खिणगीनी थोरली वाडी, तेरवण - गणपतीचे भाटले ते मेस्त्री यांच्या घरापर्यंत चा रस्ता, कोतापूर खडकवली तसेच कोतापूर श्री. श्रीधर प्रभूघाटे यांच्या घराजवळील रस्ता डांबरीकरण करणे व रस्त्याचे भूमिपूजन सोहळा पार पडला. यावेळी वरील गावातील बहुसंख्य ग्रामस्थ हजर होते. याप्रसंगी भाजपचे माजी आमदार प्रमोदजी जठार साहेब यांनी शासनाच्या विविध योजनांबद्दल माहिती देऊन, त्या कशा प्रकारे राबविता येतील याची माहिती दिली. तसेच येणाऱ्या निवडणुकीत भाजप महायुतीच्या उमेदवाराला निवडून द्या आणि मोदीच परत पंतप्रधान होतील असे सांगितले. कार्यक्रमात सुरेश गुरव भाजप तालुकाध्यक्ष. महिला तालुका अध्यक्ष सुयोगा जठार, रवींद्र नागरेकर, जिल्हा उपाध्यक्ष अभिजीत गुरव,अरविंद लांजेकर युवक अध्यक्ष सुरेश घुमे. श्रीधर प्रभुघाटे तालुका उपाध्यक्ष, माजी सरपंच मनीषा बावकर, विजय बावकर, सरपंच श्री. सखाराम आग्रे, संतोष नवरे, विवेक प्रभूघाटे, अरविंद प्रभुघाटे आणि भाजपच्या महिला कार्यकर्त्या सदरच्या कार्यक्रमासाठी मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या.



# विमल स्कूलच्या ज्ञानसागर सोहळ्यास प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** येथील जीवन ज्योत सेवाभावी संस्था संचलित विमल इंग्लिश स्कूल आणि विमल इंटरनॅशनल स्कूल व ज्युनिअर कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने त्रिमूर्ती कॅम्पस, बोरगांव रोड येथे नवीन वर्षानिमित्त सोमवारी ता. (एक) ज्ञानसागर आणि आनंद नगरी सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी मूख्याध्यापक लक्ष्मण जाधव होते. प्रमुख पाहुणे म्हणून गटशिक्षणाधिकारी एम.जी. वाघमारे, केंद्रप्रमुख शेख बरबडेकर, सिरसाठ अनिल, माजी शिक्षण विस्तार अधिकारी प्रभाकर कमटलवार, तज्ज्ञ डॉक्टर इनामदार, संस्थेचे अध्यक्ष डॉ. राम नाईक , सचिव श्री ईश्वर नाईक, संचालिका डॉ. रंजू नाईक, माजी आरोग्य सभापती डॉ. अनिता नाईक , पत्रकार बी.आर. पाचाळ, बाबुराव पाटील,लीड चे मॅनेजर फजलुर रहेमान यांची उपस्थिती होती. सोहळ्यात विद्यार्थ्यांनी विज्ञान, सामाजिक शास्त्रे, गणित, हिंदी, मराठी व इंग्रजी या विषयाचे अत्यंत आकर्षक आणि ज्ञान वर्धक प्रकल्प सादर करून उपस्थितांची मने जिंकली. या प्रदर्शनाच्या मुख्य उद्देशाने विविध वर्गाच्या विज्ञानाच्या संशोधनाची उत्सुकता वाढवण्याचा प्रयत्न केला गेला. वैज्ञानिक दृष्टिकोन आणि चिकित्सक वृत्तीला चालना मिळाली. वैज्ञानिक पद्धतीच्या तत्त्वांचा अवलंब करून गंभीर विचार, समस्या सोडविणे, वेळ व्यवस्थापन आणि संप्रेषण यासारखी विवीध कौशल्य विकसित करण्यासाठी मुलांना वाव मिळाला. तसेच आनंद नगरी मध्ये मुलांनी विवीध प्रकारचे रुचकर पदार्थ बनवून आणले. यातून व्यवहार कौशल्य, खरी कमाई काय असते हे मुलांना शिकायला मिळाले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी मेहनत घेतली.मान्यवरानी विद्यार्थ्यांना उज्ज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा दिल्या.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे

पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन
अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# अनुसूचित जाती आरक्षण वर्गीकरणाच्या बाबतीत शरद पवारांनी भूमिका स्पष्ट करावी

## लोकस्वराज्य आंदोलनचे संस्थापक प्रा. रामचंद्र भरांडे यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज



**नांदेड :** राज्यात अनुसूचित जाती आरक्षणामध्ये अ ब क ड करण्यात यावे यासाठी गेल्या 30 वर्षापासून संघर्ष सुरू असून अनुसूचित जाती संवर्गासाठी असणारे 13 टक्के आरक्षण 59 उपजातीसाठी असून या आरक्षणाचा लाभ प्रबळ व सक्षम जातीच घेत असून कमजोर व दुर्लक्षित जाते आरक्षणाच्या लाभांपासून वंचित असल्याने अनुसूचित जातीमध्ये समाविष्ट असलेल्या जातींचा विकास समतोल प्रमाणात होत नाही. त्यामुळे विषमता निर्माण झाली आहे. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वप्नातील समाज उभा करायचा असेल तर अनुसूचित जातीमध्ये अ ब क ड असे वर्गीकरण करणे गरजेचे असून त्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष माननीय शरद चंद्र पवार यांनी याबाबतीतली त्यांच्या पक्षाची भूमिका स्पष्ट करावी मागणी लोकस्वराज्य आंदोलनाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. रामचंद्र भरांडे यांनी एका माध्यमाला दिलेल्या मुलाखतीत दिले आहे. देशात आणि राज्यात मनुस्मृतीला प्रमाण मानून राज्यकारभार करणारे पक्ष सत्तेत आले असून या सत्ताधाऱ्यापासून संविधान व भारतीय लोकशाहीला मोठा धोका निर्माण झाला झाला आहे. धर्मांध विचारसरणीच्या पक्षांना सत्तेवरून खाली खेचण्यासाठी सत्तेचे, अधिकाराचे, सामाजिक न्यायाचे समान वाटप होणे गरजेचे आहे,तेंव्हाच देशातील वंचित, पीडित,शोषित समूह समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये सहभागी होऊ शकतो अन्यथा तो आपल्या मानवी अधिकारापासून कोसो दूर राहणार आहे. देशाचे ऐक्य,अखंडत्व, सार्वभौमत्व, लोकशाही, संविधान या सर्व सर्व बाबी सुरक्षित ठेवण्यासाठी धर्मांध शक्ती आरएसएस हटाव, संविधान लोकशाही बचाव हा नारा देणे काळाची गरज आहे.देश विकण्यासाठी भांडवलदार आणि धर्मांध राजकारणी तत्पर असलेले उघड्या डोळ्यांनी सारा देश पाहत असून यांच्या तावडीतून देशाला सोडविण्यासाठी शेतकरी, सामान्य शेतमजूर, कामगार, विद्यार्थी,बेरोजगार, आदिवासी, दलित, धार्मिक अल्पसंख्यांक निश्चितपणाने सकारात्मक योगदान देऊ शकतो. या सर्व घटकांना शरद पवारांनी विश्वासाने हाक द्यावी व सामाजिक न्यायाच्या वाटपाची हमी देण्याची भूमिका शिर्डी येथे होत असलेल्या कार्यकर्ता शिबिरात स्पष्ट करावी असे प्रतिपादन प्रा. रामचंद्र भरांडे यांनी केले आहे.

# चंद्रपुरात 3 ते 7 जानेवारी दरम्यान चांदा ॲग्रोचे आयोजन

## कृषी व पशु प्रदर्शनासह खिचडीचा होणार रेकॉर्ड

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या मार्गदर्शनात 3 ते 7 जानेवारी दरम्यान चांदा क्लब ग्राऊंडवर चांदा ॲग्रो – 2024 चे भव्यदिव्य आयोजन करण्यात येत आहे. कृषी तंत्रज्ञान व्यवस्थान यंत्रणा (आत्मा), कृषी विभाग व पशुसंवर्धन विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हा कृषी महोत्सवाचे उद्घाटन राज्याचे कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते 3 जानेवारी रोजी दुपारी 1 वाजता होणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, आत्माच्या प्रकल्प संचालक प्रिती हिरुळकर, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शंकर तोटेवार उपस्थित होते. या कृषी महोत्सवात शेतीविषयक तंत्रज्ञानासोबतच पशु प्रदर्शनी, चर्चा व परिसंवाद, खिचडी महोत्सव, धान्य महोत्सव, सांस्कृतिक कार्यक्रमासह नोंदणी केलेल्या शेतक-यांसाठी शेवटच्या दिवशी आकर्षक बक्षिसांची मेजवानी राहणार आहे. कृषी विषयक प्रदर्शन व शासकीय योजना शेतक-यांपर्यंत पोहचविणे, शेतकरी, शास्त्रज्ञ आणि संशोधन विस्तार विपणन साखळी सक्षम करणे, समुह / गट स्थापित करून शेतकरी उत्पादन कंपन्यांचे सक्षमीकरण करणे, कृषी विषयक शेतकरी संवाद आयोजित करून शेतक-यांच्या समस्यांचे निराकरण करणे, विक्रेता ते खरीददार संमेलनाचे आयोजन करून बाजाराभिमुख कृषी उत्पादनास चालना देणे या उद्देशाने जिल्हा कृषी महोत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे.

**6750 किलोग्रॅमची खिचडी मुख्य आकर्षण :** आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य महोत्सवाच्या निमित्ताने चंद्रपूर येथील जिल्हा कृषी महोत्सवात 6750 किलोग्रॅमची खिचडी तयार करण्यात येणार आहे . यापूर्वी एप्रिल 2022 मध्ये नाशिक येथे बगरीपासून 6000 किलोग्रॅमची खिचडी बनवून इंडिया बुक व आशिया बुकमध्ये नोंद करण्यात आली होती . चंद्रपूर नगरीत जिल्हा कृषी महोत्सवाच्या निमित्ताने महाराष्ट्र मिलेट महोत्सव अंतर्गत बाजरीचा वापर करून 6750 किलोग्रॅमची खिचडी तयार करण्यात येणार आहे .

**43 इंचाची पुंगनूर गाय विशेष आकर्षण :** आंध्र प्रदेशातील चित्तुर प्रांतात आढळणारी पुंगनुर गाय हे या प्रदर्शनाचे आकर्षण राहणार आहे . ही गाय केवळ 2 फुट उंचीची असून रंग पांढरा व भुरकट असतो . वर्षभरामध्ये ही गाय 1000 लीटरहून अधिक तेही फॅटची मात्रा असलेले दूध देते, अशी मान्यता आहे . जिल्हा कृषी महोत्सवात 43 इंचाची पुंगनुर गाय विशेष आकर्षण असणार आहे .

**पाच दिवस सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी :** दि .3 जानेवारी रोजी दुपारी 1 वाजता उद्घाटन समारंभ, गणेश स्तवन व गोंडी नृत्य ( सादरकर्ते धनराज कोवे ) सायं 6 ते रात्री 10 वाजेपर्यंत संगीत रजनी कार्यक्रम . दि .4 जानेवारी रोजी सांय 6 ते रात्री 10 पर्यंत स्थानिक लोककला कार्यक्रम . दि .5 जानेवारी रोजी सकाळी 10 ते 1 भव्य विश्वविक्रमी खिचडी ( 6750 किग्रॅ ), सायं 6 ते 8 वाजेपर्यंत श्री दर्शन महाजन, पृथ्वीवरील शेतकरी, मिलेट शो – 2 अंकी नाटक, रात्री 8 ते 10 पर्यंत श्री . अंतबुध बोरकर व संच यांचे स्थानिक आदिवासी लोककला, नाट्य एकांकिका आणि लोककला नृत्य . दि . 6 जानेवारी सायं 6 ते रात्री 10 पर्यंत सुप्रसिध्द पार्श्वगायिका श्रीमती बेला शेंडे स्वराज संगीत रजनी, तसेच चला हवा येऊ द्या फेम हास्य अभिनेते भारत गणेशपुरे यांची विशेष उपस्थिती . शेवटच्या दिवशी 7 जानेवारी रोजी सांय 6 ते रात्री 10 पर्यंत महाराष्ट्राची लोकधारा आयोजित बहारदार कार्यक्रम व इतर कार्यक्रम .

**कृषी प्रदर्शन :** शासकीय दालने, विविध कंपन्या, खाद्यपदार्थ व प्रात्याक्षिके यांचा समावेश . परिसंवादमध्ये कृषी, कृषी प्रक्रिया व पुरक व्यवसाय आधारीत चर्चासत्रांचे आयोजन, उत्पादक ते ग्राहक थेट विक्री करणे, धान्य महोत्सवाचे आयोजन, विक्रेता खरेदीदार संमेलनाचे आयोजन, जिल्ह्यातील पुरस्कार प्राप्त तसेच उल्लेखनीय काम केलेल्या शेतक–यांचा सन्मान करणे .

**300 च्या वर स्टॉल :** दि .3 ते 7 जानेवारी या कालावधीत आयोजित होणा–या जिल्हा कृषी महोत्सवामध्ये प्रदर्शनासाठी 300 च्या वर स्टॉलची उभारणी करण्याचे नियोजन आहे . यात शासकीय योजनांची माहिती व तंत्रज्ञान, कृषी विद्यापीठ तंत्रज्ञान, कृषी विज्ञान केंद्र, कृषी महाविद्यालय, मत्स्यव्यवसाय तंत्रज्ञान, बियाणे / निविष्ठा तंत्रज्ञान इत्यादी, कृषी व सिंचन तंत्रज्ञान, बँकिंग सेक्टर, मायक्रो स्मॉल ॲन्ड मिडीयम एंटरप्राईझेस ( एम .एस .एम .ई ), कृषी यांत्रिकीकरण, अवजारे, उपकरणे, धान्य, फळे व भाजीपाला, पौष्टिक तृणधान्य, शेतकरी उत्पादक कंपनी, उमेद संलग्नित महिला गट व इतर, माविम संलग्नित महिला गट व इतर नाबार्ड संलग्नित उपक्रम, फूडस्टॉल व पशुप्रदर्शनीकरीता विविध स्टॉलची उभारणी होणार आहे .



# कन्नड वकील संघाच्या अध्यक्षपदी ॲड. कृष्णा पाटील जाधव पिशोरकर

आधुनिक केसरी न्यूज

**सय्यद आरेफ़**

**पिशोर :** कन्नड वकील संघाची सालाबादा मुळे नुकतीच बैठक सम्पन्न झाली व सन 2024 या वर्षासाठी ॲड. कृष्णा पाटील जाधव यांची अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली.

कन्नड वकील संघाच्या कार्यकारिणीची दरवर्षी निवडणूक होत असते त्याप्रमाणे यावर्षी देखील निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर अध्यक्षपदासाठी ॲड. निलेश थोरात,ॲड. भगवान चव्हाण व ॲड. विजयसिंह मोहिते यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते व इतर अनेक सदस्यांनी वेगवेगळ्या पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केले होते. परंतु वकील संघाच्या वतीने सर्व सदस्यांची बैठक बोलण्यात येऊन सर्वानुमते ॲड. कृष्णा पाटील जाधव यांची अध्यक्षपदी निवड केली व इतर सर्व उमेदवारांनी आप आपली उमेदवारी परत घेतली. त्यानंतर नूतन अध्यक्षा च्या वतीने नवीन कार्यकारणी जाहीर करण्यात आली. यात उपाध्यक्ष ॲड. अनंत शेजवळ व ॲड.एस. एम. शेख, सचिव : ॲड. निलेश थोरात, सहसचिवः ॲड.महेश सावकारे , कोषाध्यक्षः ॲड.स्वप्निल उपासणी, संगणक प्रमुखःॲड. गौरव मेने,ॲड. स्वप्निल बोरसे, ग्रंथालय प्रमुख;ॲड. दीपक जोशी,ॲड. स्वप्निल मगर, सदस्य म्हणून ॲड.मनोज निंभोरकर, ॲड.महेश भारूका,ॲड. विजय चव्हाण, ॲड. साहेबराव धणेधर,ॲड. वैशाली कान्होरे, ॲड.टी. डी. शिंदे,ॲड. एस. आर. राऊत इत्यादींची निवड करण्यात आली. यावेळी वकील संघाचे मावळते अध्यक्ष ॲड. महेश देशमुख, जेष्ठ विधीज्ञ ॲड. जगन्नाथ मगर ,ॲड. भानुदास थोरात,ॲड. संजीवन मेने,ॲड. दिलीप राहणे,ॲड. संजय बोरसे, ॲड. एस.एम. शिरसे,ॲड. रामदास राऊत, ॲड. सातदिवे,ॲड. सय्यद,ॲड. कामरान,ॲड. मस्के ॲड.शिरसे ,ॲड.जाधव,ॲड. वाडीलाल राठोड, ॲड. सिद्दिकी व अन्य सर्व सदस्य उपस्थित होते. ॲड. कृष्णा पाटील जाधव यांचे वरील निवडीबाबत कन्नड तालुक्याचे माजी आमदार किशोरजी पाटील साहेब ,ज्येष्ठ विधीज्ञ निंभोरकर साहेब, त्याचप्रमाणे कन्नड तालुका डॉक्टर्स असोसिएशन नूतन अध्यक्ष व ग्रामीण रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. प्रवीण पवार, माजी नगरसेवक सुनील पवार ,समता परिषदेचे तालुका अध्यक्ष साईनाथ करवंदे, कविवर्य ज्ञानेश्वर गायके, लक्ष्मण वाल्डे, ज्येष्ठ साहित्यिक प्राध्यापक शिवाजी हूसे सर, प्राचार्य विजय भोसले सर व अन्य मान्यवरांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या...

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर

घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर